• पंढरपूर • रविवार, १९ जानेवारी २०२५
• किंमत ₹ ४ • पाने : ८



शिवचरीत्र केवळ अभ्यासाचा विषय नसून आचरणाचा आहे-देशमुख PII

# पंढरी संचार

pandharisanchar.com
RNI-MAH-MAR/1499/2000
• वर्ष २९ • अंक - २३९



आ. राजू खरे यांची दैनंदिनी जाहीर होत असल्याने हेलपाटे बंद PIII

# आ.जानकर राजीनामा देणार

## दिल्ली येथील जंतर मंतर येथे आंदोलन करणार



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** माळशिरस विधानसभा मतदार संघातील राष्ट्रवादी कॉँग्रेस शरद पवार गटाचे आमदार उत्तम जानकर हे 23 जानेवारी रोजी दिल्ली येथे मुख्य निवडणूक आयुक्तांकडे राजीनामा सादर करणार आहेत. यानंतर दिल्ली येथील जंतर मंतर येथे आंदोलन करणार असल्याची माहिती आमदार उत्तम जानकर यांनी दिली.


नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत माळशिरस विधानसभा मतदार संघातून महाविकास आघाडी राष्ट्रवादी कॉँग्रेस शरद पवार गटाने उत्तम जानकर यांना उमेदवारी दिली होती तर भाजपने माजी आमदार राम सातपुते यांना उमेदवारी दिली होती. माळशिरस विधानसभा मतदार संघात अटीतटीची निवडणूक झाली. यात राष्ट्रवादी कॉँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार उत्तम जानकर विजय झाले. उत्तम जानकर हे धनगर समाजाचे नेते आहेत. यामुळे त्यांना चांगले मताधिक्य मिळणे अपेक्षित होते. मात्र ते मिळाले नाही. यामुळे त्यांचे हक्काचे गाव असलेले मारकडवाडी येथील ग्रामस्थांनी मतदान यंत्रावर संशय व्यक्त करून पुन्हा बॅलेट पेपरवर निवडणूक घेण्यात यावी अशी मागणी केली होती. मात्र प्रशासनाने ही मागणी



फेटाळून लावली होती. यामुळे ग्रामस्थांत तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. मारकरवाडी येथील 1460 तर धानोर येथील 1200 ग्रामस्थांनी प्रतिज्ञापत्र करून निवडणूक आयोगाकडे पाठवून दिले आहे. मात्र याची दखल घेतली जात नसल्याने माळशिरस तालुक्यात नागरिकात तीव्र संताप व्यक्त होत आहे. मागणी करूनही निवडणूक आयोगाकडून पुन्हा माळशिरस तालुक्यातील काही गावात बॅलेट पेपरवर निवडणूक घेतली जात नसल्याने आमदार उत्तम जानकर नाराज झाले असून त्यांनी आपल्या आमदारकीचा राजीनामा देण्याचा निर्णय घेतला आहे. 23 जानेवारी रोजी दिल्ली येथे जाऊन ते निवडणूक मुख्य आयुक्तांकडे राजीनामा देणार आहेत. यानंतर नवी दिल्ली येथील जंतर मंतर येथे माजी आमदार बच्चू कडू यांच्या बरोबर उपोषणास बसणार आहेत. लवकरच दिल्ली येथे विधानसभेची निवडणूक होणार आहे. यामुळे यामध्येही मतदान यंत्राचा » पान ३ वर

## At a Glance

### बंद पडलेले सीसीटीव्ही कॅमेरे करा सुरू



**सांगोला :** सांगोला शहर आणि तालुक्यात छोट्या-मोठ्या चोरीच्या घटना, लुटमार, वाहतुकीचा प्रश्न, वाळू वाहतूक, मोबाईल चोरी, अनुचित प्रकार, हाणामारीसारख्या घटना घडत आहेत. यामध्ये सण उत्सव निमित्ताने नेहमीच चोरीच्या घटना घडत असताना चोरी रोखण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे महत्त्वाचे ठरत आहेत. बंद पडलेले कॅमेरे दुरुस्त करून घ्यावेत. कॅमेरे सुरू झाल्यास चोरीचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार असल्याचे नागरिकांमधून बोलले जात आहे

### संविधान जनजागृती काळाची गरज



**सोलापूर :** जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था क्रमांक एकने अत्यंत उपयुक्त असे संविधान साक्षरतेचे नवे उपक्रम संविधान अमृत महोत्सव वर्षानिमित्त दिनदर्शिकेच्या माध्यमातून केलेले आहे, असे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी येथे बोलताना केले. संविधान व संविधानाचे विविध वैशिष्ट्ये दिनदर्शिकेच्या माध्यमातून सर्वसामान्यांना अवगत करण्याचे काम करून पतसंस्थेने एक वेगळा आदर्श या माध्यमातून दिल्याचे जंगम यांनी सांगितले.

### शिकवणीला निघालेल्या मुलीचा अपघातात मृत्यू



**सोलापूर :** भरधाव वेगाने मागून येणाऱ्या छोट्या टिपरने दुचाकीला कट मारल्याने झालेल्या अपघातात सात वर्षीय चिमुकलीचा जागीच मृत्यू झाला. हा अपघात शुक्रवारी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास सोलापूर तालुका पोलीस ठाण्याजवळ घडला. साक्षी कलबुरगी ( रा. हुसेन नगर ) असे अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या मुलीचे नाव आहे. साक्षी ही आपल्या आईसोबत दुचाकीवरून शिकवणीला जात होती. त्यावेळी हा अपघात घडला.

### रेशीम उद्योग वाढीसाठी प्रयत्न करावेत

**सोलापूर :** सोलापूर जिल्ह्यात रेशीम शेती उद्योगासाठी खूप वाव आहे. रेशीम शेतीचे महत्व व त्यातून मिळणाऱ्या शाश्वत उत्पन्नाची शेतकऱ्यांना माहिती व्हावी याकरीता जिल्ह्यात महारेशीम अभियान-2025 राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून जिल्ह्यात रेशीम उद्योग वाढीसाठी प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन जिल्हा रेशीम विकास अधिकारी विनीत पवार यांनी केले. जिल्ह्यातील 11 तालुक्यांमध्ये 1हजार 17 शेतकऱ्यांचा 1 हजार 260 एकरावर हा उद्योग चालु असून दि. 9 जानेवारी ते 9 फेब्रुवारी 2025 या कालावधीत महारेशीम अभियान राबविण्यात येत आहे.

## आयुक्तांच्या पथकाकडून जिल्हा परिषदेची तपासणी सुरू

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी शासन कोट्यावधी रुपयाचा निधी देते. या निधीतून जिल्हा परिषदे कडून विविध सोयी सुविधा नागरिकांना पुरविल्या जातात. शासनाने दिलेल्या निधीचा वापर योग्य प्रकारे झाला आहे की नाही. याची पाहणी व तपासणी करण्यासाठी पुणे विभागीय आयुक्तांचे पथक सोलापूर येथील जिल्हा परिषदेमध्ये दाखल झाले आहे. हे पथक 28 जानेवारीपर्यंत विविध विभागाची तपासणी करणार आहे .

ग्रामीण भागाचा कायापालट करण्यासाठी व नागरिकांना सोयी सुविधा मिळाव्यात म्हणून केंद्र व राज्य शासन ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींना कोट्यावधी रुपयाचा निधी देते. हा निधी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ग्रामपंचायतींना दिला जातो. या निधीतून नागरिकांना वीज, रस्ते, पाणी, आरोग्य व इतर सोयी सुविधा दिल्या जातात. मात्र काही गावात कागदोपत्री काम झाले असल्याचे दाखविले जाते. प्रत्यक्षात नागरिकांना सोयी सुविधा मिळत नाहीत. याबाबतच्या तक्रारी होत असल्याने याची दखल घेऊन पुणे विभागीय आयुक्तांनी जिल्हा परिषदेने केलेल्या विविध कामाची पाहणी व तपासणी करण्यासाठी नऊ सदस्य असलेले पथक 15 जानेवारी रोजी सोलापूर येथील जिल्हा परिषद मध्ये पाठविले आहे. हे पथक 28 जानेवारीपर्यंत विविध विभागाची तपासणी करणार आहे. यामध्ये आरोग्य विभागातील औषध भांडार, लस भांडार, कुटुंब कल्याण कार्यक्रम, लसीकरण आढावा, साथीच्या रोगांना आळा घालण्यासाठी केलेल्या उपाययोजना, महिला व बालकल्याण विभागाकडून दिल्या जाणाऱ्या विविध योजना, महिला दक्षता समितीची कामे, जिल्हा परिषदेचा सेसफंड किती खर्च झाला? स्वच्छ ता अभियान, संत गाडगेबाबा अभियान, सार्वजनिक स्वच्छालय, घनकचरा व सांडपाणी अहवालाची तपासणी करण्यात येणार आहे.

जिल्हा परिषदेने केलेल्या कामकाजाची पाहणी व तपासणी करण्यासाठी पुणे विभागीय आयुक्तांचे पथक दाखल झाल्यामुळे जिल्हा परिषदेतील कर्मचारी कामाला लागले असल्याचे दिसून येत आहे.



## घरात एकालाच मिळणार PM किसानचे पैसे!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** पीएम किसान योजनेबाबत केंद्र सरकारची नवी नियमावली जाहीर करण्यात आली आहे. मागच्या काळात एकाच कुटुंबात योजनेचा लाभ घेणारे दोन ते तीन शेतकरी होते. असे बरेच कुटुंब आढळले होते. त्यामुळे यापुढे पीएम किसान योजनेअंतर्गत एकाच कुटुंबातील पती, पत्नी, मुलगा, मुलगी लाभ घेत असल्यास त्यातील एकालाच यापुढे या योजनेचा लाभ घेता येणार आहे.

## श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरास चांदीची फुलदाणी व बाऊल भेट

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीस डॉ.नंदकुमार नागू जगताप, भाळवणी (ता. पंढरपूर) यांनी सुमारे 550 ग्रॅम वजनाची चांदीची फुलदाणी तसेच सुहास शिवाजी मरळ, पुणे यांनी 996 ग्रॅम वजनाचे दोन बाऊल भेट दिल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

सदरच्या दोन्ही वस्तूची अनुक्रमे 44 हजार व 88 हजार इतकी किंमत होत आहे. संबंधित देणगीदार जगताप यांचा मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सदस्य संभाजी शिंदे व व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा व उपरणे देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. तसेच मरळ यांचा मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर यांच्या हस्ते श्रीची प्रतिमा व उपरणे देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी देणगीदार यांचे कुटुंब, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, विभाग प्रमुख ज्ञानेश्वर कुलकर्णी, सराफ गणेश भणगे व सुपेकर उपस्थित होते. श्री विठ्ठल रुक्मिणीमातेस सोने चांदी भेट स्वीकारण्यासाठी स्वतंत्र विभागाची निर्मिती, यासाठी अनुभवी विभाग प्रमुख तसेच तज्ञ दोन सराफाची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच संगणक प्रणाली देखील विकसित करण्यात आली असून, भाविकांना संगणकीकृत पावती देण्यात येते.

## सूर्यास्तानंतर अटक केल्याचा ठपका; महिलेची सुटका



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माढा :** सुर्यास्तानंतर अवघ्या तीन मिनिटांनी महिलेला ताब्यात घेणे पोलिसांच्या अंगलट आहे. ही अटक बेकायदा ठरवत उच्च न्यायालयाने या महिलेला जामीन मंजूर केला. पायल वर्मा असे या महिला आरोपीचे नाव आहे. टेंभूर्णी पोलिसांनी केलेली अटक बेकायदा ठरवून माझ्या सुटकेचे आदेश द्यावेत अशी मागणी याचिकेत करण्यात आली होती. न्या. सारंग कोतवाल व न्या. एस. एम. मोडक यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी झाली. नियमानुसार महिलेला सूर्यास्तानंतर अटक करता येत नाही, असा दावा पायल यांच्याकडून करण्यात आला होता.

## पोलीस अधिकाऱ्याला केली धक्काबुक्की

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सोलापूर :** मोटार सायकल चोरीचा तपास करत असताना सहायक पोलीस निरीक्षकांना धक्काबुक्की करून सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी तिघांविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. हा प्रकार 15 जानेवारी रोजी सायंकाळी सव्वा पाच ते साडेसहा वाजण्याच्या सुमारास हरीभाई देवकरण प्रशाला ते मार्केट पोलीस चौकी यादरम्यान घडला. याप्रकरणी मुजीब समीर पठाण, नसीम समीर पठाण, सामिया समीर पठाण (सर्व राहणार शिवगंगा नगर, भाग 3, नई जिंदगी, सोलापूर ) अशी गुन्हा दाखल झालेल्या तिघांची नावे आहेत.

## चांदीची भेट

पंढरी संचार छायाचित्र सेवा



पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीस डॉ.नंदकुमार नागू जगताप, भाळवणी (ता. पंढरपूर) यांनी सुमारे 550 ग्रॅम वजनाची चांदीची फुलदाणी तसेच सुहास शिवाजी मरळ, पुणे यांनी 996 ग्रॅम वजनाचे दोन बाऊल भेट दिल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

## बँकांचा शेतकऱ्यांना मदतीचा हात

# जिल्ह्यात 4599 कोटी पिक कर्ज वाटप

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना खरीप व रब्बी हंगामात पिकांची लागवड करता यावी म्हणून राष्ट्रीयकृत व जिल्हा बँकेकडून सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना 4599 कोटी रुपयाचे कर्ज वाटप करण्यात आले आहे. यामुळे शेतकऱ्यांना बँकांकडून मदतीचा हात मिळाला असल्यामुळे शेतकऱ्यांतून समाधान व्यक्त होत आहे.

राज्यातील शेतकरी आर्थिक अडचणीत असल्यामुळे त्यांना मदत करता यावी म्हणून शासनाने सर्व राष्ट्रीयकृत व जिल्हा बँकांना शेतकऱ्यांना पीक कर्ज देण्यात यावे अशा सूचना केल्या होत्या. याबाबत प्रत्येक बँकेला कर्ज वाटपाचे उद्दिष्ट देण्यात आले होते. यामुळे सोलापूर जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी



बँकांकडे पीक कर्ज मिळावे म्हणून अर्ज दाखल केले. याची दखल घेऊन बँकांनी पीक कर्ज वाटप केले आहे. सोलापूर जिल्ह्यात खरीपासाठी 3538 कोटी रुपयाचे तर रब्बीसाठी 905 कोटी रुपयाचे पीक कर्ज वाटप करण्यात आले आहे. असे दोन्ही मिळून 4599 कोटी 80 लाख रुपयाचे पीक कर्ज वाटप करण्यात आले आहे. खरीप हंगामात उद्दिष्टापैकी 77% पीक कर्ज बँकांनी दिले आहे. तर रब्बी हंगामात 43 टक्के पीक कर्जाचे वाटप करण्यात आले आहे. आणखी मार्चपर्यंत वाटप करण्यात येणार आहे. गेल्या अनेक वर्षापासून शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. शेतकरी शेतात पिकांची लागवड करण्यासाठी बँका खाजगी सावकार पतसंस्था यांच्याकडून कर्ज घेतात. मात्र नैसर्गिक आपत्तीमुळे शेतातील पिकांचे नुकसान होते. यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडतो. मात्र कर्ज वसुलीसाठी तगादा लावला जातो. यातून शेतकरी टोकाचे पाऊल उचलत आहे. याची दखल घेऊन शासनाने शेतकऱ्यांना बिनव्याजी पीक कर्ज वाटप बँकांनी करावे अशा सूचना दिल्या आहेत.याची अंमलबजावणी सोलापूर जिल्ह्यात चांगल्या प्रकारे झाली आहे. यामुळे शेतकऱ्यांतून समाधान व्यक्त होत आहे.

पंढरी संचार

## स्वतःच्या गळ्यावर वार करून तरुणाची आत्महत्या

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सोलापूर :** काचेने स्वतःच्या गळ्यावर वार करून 17 वर्षांच्या प्रचित भगवान मुंडे ( राहणार समर्थ नगर, विजापूर रोड, सोलापूर) या मुलाने आत्महत्या केली. हा प्रकार गुरुवारी रात्री अकरा वाजता विजापूर रोड वरील वेदांत टॉवर वरील घरात घडला. प्रचित हा समर्थ नगर येथे राहावयास आहे. मात्र गुरुवारी रात्री तो वेदांत टॉवर वरील पहिल्या मजल्यावरील घरात गेला. घरातील शौचालय बाथरूमचा दरवाजा आतून बंद केला. त्यानंतर त्याने तेथील खिडकीची काच तोडून स्वतःच्या गळ्यावर मारून घेतली.

## बेकायदा वाळू उपशामुळे चंद्रभागेच्या वाळवंटाची दैना



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** विठुरायाच्या दर्शनाची आस घेऊन येणाऱ्या लाखो भाविकांना विठुरायाच्या दर्शनासोबत चंद्रभागेचे स्नान केल्याशिवाय वारी पोहोचवल्याचे समाधान मिळत नसते आणि त्यामुळेच वारकरी संप्रदायात विठ्ठल मंदिरा एवढेच चंद्रभागा स्नानाला महत्व असते. मात्र काही वर्षांपासून या चंद्रभागेकडे वाळू माफियांनी आपली दृष्टी वळवली आणि चंद्रभागा अक्षरशः ओरबाडून काढल्याचे विदारक चित्र निर्माण झाले आहे. ज्या पवित्र वाळवंटात शेकडो संतांनी वारकरी संप्रदायाचा संजीवनी संदेश जगाला दिला त्याच वाळवंटात आज पाऊल ठेवणे देखील अशक्य बनले आहे.

**मोहोळ :** दोन वर्षांपूर्वी जानेवारीमध्ये उजनीचा डावा कालवा फुटून पाटकूल आणि परिसरातील शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचे पैसे द्यावेत, अशी मागणी मोहोळचे आमदार राजू खरे यांनी जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीत केल्यानंतर येत्या आठ दिवसांत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पैसे मिळतील, अशी ग्वाही जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली आहे.

## MAHAPEX -२०२५ टीम रायगड एक्सप्रेस च्या ई-सायकल रॅलीचे

# पंढरपूर डाक विभागाकडून जंगी स्वागत

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** दिनांक २२ जानेवारी २०२५ ते २५ जानेवारी २०२५ या कालावधी मध्ये वर्ल्ड ट्रेड सेंटर ,मुंबई येथे होणाऱ्या MAHAPEX -२०२५ (डाक तिकिटांचे प्रदर्शन) अंतर्गत जनजागृती साठी छत्रपती संभाजीनगर येथून दिनांक ०२ जानेवारी २०२५ रोजी निघालेली ई-सायकल रॅली पंढरपूर मध्ये काल दिनांक १६ जानेवारी २०२५ रोजी सोलापूरहुन दाखल झाली होती. या ई सायकल रॅली चे पंढरपूर डाक विभागाचे डाक अधीक्षक श्री. चंद्रकांत भोर साहेब, सहा. अधीक्षक श्री. एम. एम. पाटील साहेब, यांच्या मार्गदर्शानुसार काल टीमचे मुख्य श्री. श्रीकांत माने सहा. अधीक्षक (प्रवास) धाराशिव विभाग आणि त्यांचे सर्व सहकारी यांचे विठुरायाच्या पावन नगरीमध्ये मोठ्या उत्साहात आणि थाटामाटात स्वागत करण्यात आले. यावेळी या ई- सायकल रॅलीमध्ये सहभागी झालेल्या टीमचा व पंढरपूर मधील डाक तिकिटांचे संग्राहक डॉ. श्रीधर यलमार यांचाही सन्मान करण्यात आला.

दुसऱ्या दिवशी छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. श्री. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून पंढरपूर येथील द.ह. कवठेकर प्रशाला येथे रॅलीतील टीम रायगड एक्सप्रेस टीम प्रमुख श्रीकांत माने साहेब यांनी पोस्ट ऑफिस च्या तिकीट जमा / गोळा करण्याच्या छंदाबाबत, ढाई आखार पत्र लेखन स्पर्धेबाबत शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थी यांना माहिती दिली. तसेच पर्यावरण संतुलन राखण्यासाठी सायकल वापराचे आवाहन केले. विद्यार्थ्यांना पर्यावरण रक्षणासाठी प्रयत्न करण्यासाठी प्रेरणा दिली. त्यानंतर बाल विठ्ठल रुक्मिणी आणि वारकरी यांच्या सह नामदेव पायरी येथे श्री. ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये महापेक्स २०२५ च्या ध्वजाचे अनावरण भजन, कीर्तन आणि टाळ, मृदूंग, वीणा यांच्या निनादामध्ये पंढरपूर विभागातील कमर्चारी बंधू भगिनी यांच्या उपस्थितीमध्ये पार पडले.

या प्रसंगी पंढरपूर डाक विभागाचे डाक अधीक्षक श्री. चंदक्रांत भोर सर, सहा. अधीक्षक श्री. एम. एम. पाटील सर, श्री. ज्ञानेश्वर देशमुख महाराज जळगावकर, उपाध्यक्ष विठठल रुक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर, पंढरपूर हेड पोस्ट ऑफीस चे पोस्टमास्तर सोमनाथ गायकवाड आणि पंढरपूर विभागातील कमर्चारी बंधू भगिनी यांनी रॅली च्या बारामती - सासवड- पुणे - महाड - रायगड मार्गे गेट वे ऑफ इंडिया, मुंबई या मार्गक्रमणासाठी हिरवा झेंडा दाखवून मार्गस्थ होण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## कत्तलखान्याकडे जनावरे घेऊन जाणारा टेम्पो उलटला




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मंगळवेढा :** मंगळवेढा-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर जनावरे भरून कत्तलखान्याकडे भरधाव वेगात जाणारा टेम्पो पलटी झाला. यावेळी ६ गायी व ४ वासरे मयत झाली. यामध्ये एकूण १ लाख ८७ हजार रुपयांचे नुकसान केल्याप्रकरणी अज्ञात टेम्पो चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. १६ जानेवारी रोजी पहाटे ५ वा. पोलिस गस्त घालत असताना हायवे कंट्रोलवरून अमोल गोरख गावडे यांनी माहिती दिल्यानुसार मंगळवेढा-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील सुगरण हॉटेलजवळ आयशर टेम्पो क्र. एमएच ४५/७५४५ वरील अज्ञात चालकाने अपघात केला.

» Selected

## माजी खासदार जात प्रमाणपत्रावर लवकरच निर्णय!

**सोलापूर :** माजी खासदार डॉ. जयसिद्धेश्वरजयसिद्देश्वर महास्वामी यांच्या जात प्रमाणपत्रासंदर्भात दक्षता पथकाने त्यांचा अहवाल सोलापूरच्या जात प्रमाणपत्र पडताळणी समितीला सादर केला आहे. त्यावर समितीने डॉ. महास्वामींकडून खुलासाही मागविला असून त्यांचा खुलासा समितीला प्राप्त झाल्याची माहिती समितीकडून देण्यात आली. त्यावर आता जानेवारीअखेर सुनावणी होण्याची शक्यता आहे. २०१९च्या लोकसभा निवडणुकीनंतर काही जणांनी खासदार डॉ. महास्वामी यांच्या जात प्रमाणपत्रावर आक्षेप घेत ते खोटे असल्याचा दावा केला होता.

## मंदीरामध्ये सुलभ दर्शनासाठी विविध उपाययोजना



**अक्कलकोट :** श्री स्वामी समर्थ महाराजांच्या दर्शनाकरीता परगावाहून येणाऱ्या स्वामी भक्तांची संख्या प्रचंड वाढत आहे. या अनुषंगाने श्री स्वामी समर्थ महाराज देवस्थान विश्वस्त समितीच्या वतीने येणाऱ्या सर्व भाविकांना लवकरात लवकर व सुलभ स्वामी दर्शन कसे मिळेल यासाठी विविध उपाय योजना राबविण्यात येणार आहेत. स्वामी भक्तांची संख्या प्रचंड वाढल्याने व मंदीर परिसरातील जागा मर्यादीतमर्यादित असल्याने भाविकांची दर्शन रांग मंदीराबाहेरीलमंदिराबाहेरील रोडवर जात आहे. मंदिराच्या दक्षिण महाद्वारालगत वारंवार गर्दीच्या वेळी कापडी मंडप उभारण्यात येतो.

## चार बांगलादेशी महिला, दोन पुरुषांना पोलिस कोठडी



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बार्शी :** बनावट आधार कार्ड तयार करून बार्शीतील पंकजनगर येथे राहत असलेल्या चार बांगलादेशी महिलांना व २ पुरुषांना बार्शी पोलिसांनी अटक केली. त्यांना बार्शी न्यायालयात न्यायाधीश पी. व्ही. राऊत यांच्यासमोर हजर केले असता २१ जानेवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावली. ही घटना १६ जानेवारी रोजी बार्शी शहरातील पंकजनगर येथे घडली. याबाबत महिला पोलिस निरीक्षक सोनम जगताप यांनी पंकजनगर परिसरात बांगलादेशी नागरिकांकडून घुसखोरी व बनावट दस्तऐवज याच्या वापरासंदर्भात शहर पोलिसात गुन्हा दाखल झाला होता.

## शालेय राज्यस्तरीय शूटिंग बॉल स्पर्धेत नागनाथ विद्यालयास तिहेरी मुकूट



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मोहोळ :** शालेय राज्यस्तरीय शूटिंग बॉल स्पर्धेत पुणे विभागाचे नेतृत्व केलेल्या नागनाथ विद्यालय व ज्युनि. कॉलेज मोहोळच्या १७ वर्षे मुले,मुली व १९ वर्षे मुलीच्या संघाने अनुक्रमे १७वर्षे मुले द्वितीय क्रमांक, १७ वर्षे मुली तृतीय क्रमांक व १९ वर्षे मुली द्वितीय क्रमांक पटकावून तिहेरी मुकुट संपादन केले.

क्रीडा व युवक सेवा संचनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यवतमाळ येथील जिल्हा क्रीडा संकुलात १२ ते १४ जाने. दरम्यान स्पर्धा पार पडली. यशस्वी खेळाडूंचे व मार्गदर्शक संभाजी चव्हाण, समीर शेख, आबा गावडे, संतोष सीताप व श्रीमती सुनिता घाडगे यांचे जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश पवार आणि विद्यालयाचे मुख्याध्यापक बशीर बागवान, उपप्राचार्य प्रकाश शिंदे आदींनी अभिनंदन केले.

## सहभागी होणार...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**सोलापूर :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, महाराष्ट्र प्रदेशचे नव-संकल्प शिबीर 18 व 19 जानेवारी 2025 शिर्डी अहिल्यानगर, येथे सुरू आहे. या शिबिरात सोलापुरातून राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे, माजी नगरसेवक गणेश पुजारी आदी सहभागी झाले आहेत. यावेळी चंदनशिवे व पुजारी यांनी क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, मंत्री संजय बनसोडे आदींची भेट घेऊन त्यांचा सत्कार केला. यावेळी आदित्य चंदनशिवे, अक्षय मस्के, भीमा मस्के आदी उपस्थित होते.

## वाघ येडशीतून उक्कडगावकडे



**बार्शी :** येडशीच्या दक्षिण भागातून वाघ रेस्क्यू टीमला चकवा देऊन उत्तर भागात गेला आहे. बार्शी तालुक्यातील उक्कडगाव हद्दीत त्याने शुक्रवारी सायंकाळी तीन जनावरांवर हल्ला केला आहे. या हल्ल्यात तिन्ही जनावरे दगावली. ही माहिती समजताच वनविभागाचे अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घटनास्थळाकडे धाव घेतली. दरम्यान, चौथ्या दिवशीही रेस्क्यू टीमला वाघाला पकडण्यात यश आले नाही.

## सागर उरवणे यांना सलग तीन वर्ष मिळाला MDTR USA पुरस्कार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**माळशिरस :** MDTR USA हा विमा क्षेत्रातील अत्यंत मानाचा समजला जाणारा पुरस्कार आहे हा पुरस्कार जगातील एकूण विमा प्रतिनिधी पैकी फक्त एक टक्के विमा प्रतिनिधी मिळवू शकतात हा पुरस्कार सागर उरवणे यांनी सलग तीन वर्षे मिळवलेला आहे मागील 21 वर्षापासून सागर उरवणे यांनी ग्राहकांना विनम्र व तत्पर सेवा देत आत्तापर्यंत जवळपास दोन हजार ग्राहकांना विम्याचे छत्र प्रदान केलेले आहे येणाऱ्या जून महिन्यात अमेरिका येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय विमा परिषदेत ते सहभागी होणार आहेत अशी माहिती त्यांनी दिलेली आहे हा पुरस्कार मिळवण्यासाठी त्यांना त्यांचे विकास अधिकारी माननीय श्री निकम साहेब LIC अकलूज शाखेचे शाखाधिकारी अनोकार साहेब यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले व या पुरस्काराबद्दल LIC पंढरपूर शाखेचे शाखाधिकारी श्री गुळवणी साहेब यांनी त्यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या

## ट्रॅक्टर मागे घेताना चाकाखाली चिरडून युवकाचा मृत्यू




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सांगोला :** ट्रॅक्टर ट्रॉली पाठीमागे घेताना झोपलेल्या ट्रक चालकाच्या तोंडावरून व अंगावरून टायरची चाके गेल्याने त्याचा चिरडून दुर्दैवी अपघाती मृत्यू झाला. ही घटना गुरुवार, दि. १६ रोजी मध्यरात्री राजुरी (ता. सांगोला) गावातील दबडे हॉस्पिटलच्या पाठीमागे रोडलगत घडली. विलास बापू दबडे (वय ३४, रा. राजुरी) असे मृताचे नाव आहे. याबाबत, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी यांनी खबर दिली असून, पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. दरम्यान, पोलिसांनी ट्रॅक्टर चालकास ताब्यात घेतले आहे.

## द.ह.कवठेकर प्रशालेस जीडीपी पेंटच्या डिस्ट्रीब्यूटर व एस एस आय पेंट च्या प्रोप्रायटर श्रुती कुलकर्णी व अनुप कुलकर्णी यांची सदिच्छा भेट

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** पंढरपूर एज्युकेशन सोसायटीच्या द.ह.कवठेकर प्रशालेस नामांकित असणाऱ्या जी.डी.बी. पेंट डिस्ट्रीब्यूटर व एसएसआय कंपनीच्या प्रोपरायटर श्रुती कुलकर्णी व अनुप कुलकर्णी, कन्या जान्हवी कुलकर्णी यांनी नुकतीच सदिच्छा भेट दिली. कंपनीच्या सी.एस.आर. फंडाच्या माध्यमातून द.ह. कवठेकर प्रशालेस सुमारे तीन लाख रुपयाचा मोफत रंग रोटरी यन धनंजय राजूरकर यांच्या प्रयत्नातून पुरवण्यात आला होता. त्याची पाहणी करण्यासाठी कंपनीच्या उभयतांनी आज प्रशालेत सदिच्छा भेट दिली. यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. व्ही. एम. कुलकर्णी सर यांनी त्यांना प्रशालेबद्दलची माहिती दिली. श्रुती कुलकर्णी व अनुप कुलकर्णी यांच्या सामाजिक कार्याबद्दल समाधान व्यक्त केले. प्रो. अनुप कुलकर्णी यांनी त्यांच्या एस एस आय कंपनीच्या कार्याबद्दल व सेवेबद्दल माहिती दिली. यावेळी त्यांनी संपूर्ण प्रशालेतील इमारतीच्या रंगकामाची पाहणी केली. प्रशालेस लागेल तेव्हा रंगकामासाठी मदतीचा हात देण्याचे आश्वासन दिले. प्रशालेचे उपमुख्याध्यापक श्री एस. एस. रुपनर सर यांनी आभार व्यक्त केले. प्रशालेचे जेष्ठ क्रीडाशिक्षक श्री प्रशांत मोरे सर श्री, शेलार सर , कलाशिक्षक श्री. अमित वाडेकर सर, सेवक श्री संजय गोसावी यांनी लेझीमच्या माध्यमातून पाहुण्यांचे स्वागत केले. सौ.भक्ती रत्नपारखी, सौ. अपर्णा अयाचित मॅडम यांनी पाहुण्यांचा सत्कार केला. कार्यक्रमाचे निवेदन श्री एस. एम. कुलकर्णी सर यांनी केले. यावेळी कवठेकर प्रशालेचे श्री.चंद्रशेखर राजूरकर सर, प्रशालेतील सर्व शिक्षक बंधू भगिनी, शिक्षकेतर कर्मचारी बंधू व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 10 वीच्या विद्यार्थ्यांना 2 दिवसांत मिळणार हॉल तिकीट



**सोलापूर :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावीच्या 2025 च्या बोर्ड परीक्षेसाठी प्रवेशपत्र जारी करण्याची तारीख जाहीर केली आहे. येत्या 20 फेब्रुवारीपासून परीक्षेची हॉल तिकीट ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध होणार आहेत. विद्यार्थ्यांना www.mahahsscboard.in या वेबसाइटवर जाऊन प्रवेशपत्र डाऊनलोड करता येईल. जर तांत्रिक अडचणी उद्भवल्या, तर शाळांना विभागीय मंडळाशी संपर्क साधण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.




## पंढरपूर अर्बन बँकेच्या व्याख्यानमालेस प्रारंभ

# शिवचरीत्र केवळ अभ्यासाचा विषय नसून आचरणाचा आहे-देशमुख

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र हे केवळ ऐकण्याचा, अभ्यासाचा किंवा अभिमानाचा विषय नसून आजच्या युवकांनी याचे आचरण करण्याचा विषय आहे. महाराजांच्या एक एक घटना पाहिल्या तर यामधून याकाळात देखील जगण्याचा मंत्र मिळतो असे प्रतिपादन रायगड येथील प्रसिध्द शिवव्याख्याते प्रशांत देशमुख यांनी केले. येथील दि पंढरपूर अर्बन को.ऑप.बँकेच्या वतीने आयोजित देशभक्त कै.बाबुराव जोशी व्याख्यानमालेस प्रारंभ झाला असून याच्या पहिल्या दिवशी देशमुख हे बोलत होते. व्याख्यानमालेचे उद्‍घाटन सौ.सीमाताई प्रशांत परिचारक यांच्या हस्ते तसेच बँकेचे अध्यक्ष सतीशजी मुळे, उपाध्यक्षा माधुरीताई जोशी यांच्या प्रमुख उपस्थित करण्यात आले.प्रशांत देशमुख यांनी आपल्या अतिशय ओघवत्या व उत्स्फुर्त शैलीमध्ये उठ युवका जागा हो शिवचरित्राचा तू धागा हो या विषयावर जवळपास दीड तास उपस्थित प्रेक्षकांना खिळवून ठेवले. यावेळी बोलताना देशमुख यांनी, छत्रपती शिवाजी महाराज हा आपला स्वाभिमान असून मराठी मातीचे महान सुपूत्र आहेत. महाराजांच्या आयुष्यातील एक प्रसंग अतिशय विलक्षण असून यामधून मोठा संदेश मिळतो. जवळपास चारशे वर्षा नंतर देखील महाराजांनी दिलेली शिकवण, त्यांच्या आयुष्यात आलेले विविध प्रसंग पाहिल्यावर ते ज्या प्रमाणे वागले ते पाहून आजच्या काळात देखील कसे जगावे याची शिकवण मिळते असे प्रतिपादन केले. यासाठी देशमुख यांनी काही उदाहरण दिली. आजची पिढी लगेच हताश होते, टोकाचे पाऊल उचलून आत्महत्येचा मार्ग स्वीकारते. मात्र महाराजांनी मोठ्या कष्टाने राज्य मिळविले. मात्र मिर्झाराजे जयसिंग यांच्या बरोबर झालेल्या तहात त्यांना आपले किल्ले व अनेक गोष्टींचा त्याग केला. परंतु तरीही त्यांनी हार मानली नाही, औरंगजेबाच्या कैद म्हणजे मृत्यू परंतु यावरही हुशारीने मात करून तेथून निसटले असे प्रसंग पाहिल्यावर संकटाला पाठ न दाखविता त्यावर मात करणे शिकवते. शत्रुच्या स्त्रीवर हात टाकणाऱ्या आपल्या सरदाराला व पत्नीच्या भावाला देखील भर सभेत शिक्षा करून त्यांनी कायदा सर्वांना समान असल्याचा संदेश दिला. सुरते मध्ये विधवा स्त्रीच्या घराचे संरक्षण केले कारण तीचा पती वारला होताच परंतु तो दानधर्म करणार होता. यावरून चांगल्या कर्मावर त्यांचा विश्वास होता. सर्व जातीला बरोबर घेणारा, त्यांच्यातील गुणांना वाव देणारा हा राजा सर्वोत्तम नेता होता असे सांगून देशमुख यांनी केवळ घोषणाबाजी करून महाराज समजणार नाहीत यासाठी त्यांच्या शिकवणुकीचे आचरण करा असा सल्ला प्रशांत देशमुख यांनी दिला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक बँकेचे संचालक हरिष ताठे यांनी, सूत्रसंचलन शांताराम कुलकर्णी यांनी तर आभार डॉ.संगिता पाटील यांनी मानले.यावेळी पांडुरंग कारखान्याचे माजी अध्यक्ष दिनकर मोरे, बाजार समितीचे माजी सभापती दाजी भुसनर, पंचायत समितीचे माजी उपसभापती प्रशांतभैय्या देशमुख यांच्यासह पंढरपूर अर्बन बँकेचे संचालक पांडुरंग घंटी, विनायक हरिदास, अमित मांगले, गणेश शिंगण, मनोज सुरवसे, अनिल अभंगराव, गजेंद्र माने, तज्ज्ञ संचालक प्रभुलिंग भिंगे, उदय उत्पात, सोमनाथ होरणे आदी उपस्थित होते.

पंढरी संचार

**सोलापूर :** सोलापुरातील नई जिंदगी येथील आपल्या राहत्या घरात अचानक चक्कर येऊन पडल्याने बेशुद्ध झालेल्या सोनाली कामण्णा दाते ( वय 28 )या तरुणीचा मृत्यू झाला. हा प्रकार शुक्रवारी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास घडला. सोनाली या बेशुद्ध झाल्यानंतर त्यांना त्यांचा भाऊ राहुल चौगुले यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला होता.

## देशमुख व सूर्यवंशी कुटुंबातील सदस्य राहणार उपस्थित

# सकल मराठा समाजाच्यावतीने बुधवारी आक्रोश मोर्चाचे आयोजन

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** सरपंच संतोष देशमुख व परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी यांच्या हत्येच्या निषेधार्थ अखंड मराठा समाजाचा सोलापूर जिल्ह्याच्यावतीने बुधवार २२ रोजी आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती सोलापूर येथील समन्वयक रवी मोहिते यांनी दिली. या मोर्चास संघर्षयोध्दा मनोज जरांगे-पाटील, आमदार सुरेश धस यांच्यासह देशमुख व सूर्यवंशी यांचे कुटुंबीय देखील उपस्थित राहणार आहेत.

याबाबत माहिती देण्यासाठी मराठा समाजातील पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. यास माजी उपनगराध्यक्ष नागेश भोसले, कुर्दूवाडीचे संजय टाणपे, संभाजी ब्रिगेडचे दीपक वाडदेकर, किरण घाडगे, स्वराज पक्षाचे महादेव तळेकर, किरण भोसले, दिगंबर सुडके, विनोद लटके, महेश पवार, आकाश पवार, बंटी भोसले आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना मोहिते यांनी, सरपंच संतोष देशमुख यांची क्रूरपणे हत्या करण्यात आली आहेच, परंतु परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी यांची देखील पोलीस कोठडीत हत्याच केली असल्याचा आरोप केला. या दोन्ही प्रकरणातील आरोपींना कठोर शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी केली.

तर दीपक वाडदेकर यांनी, या प्रकरणाचा तपास योग्य दिशेने होण्यासाठी तसेच यातून आरोपींची नावे वगळली जाऊ नयेत यासाठी आक्रोश मोर्चा आयोजित केला असल्याची माहिती दिली.

सदर मोर्चा बुधवार २२ रोजी सकाळी अकरा वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकातून निघणार आहे. या आक्रोश मोर्चामध्ये संतोष देशमुख व सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबातील सदस्य तसेच खासदार बजरंग सोनवणे, संभाजीराजे छत्रपती, अण्णासाहेव पाटील आर्थिक महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, आमदार संदीप क्षीरसागर, दीपक केदार हे देखील उपस्थित राहणार आहेत. संपूर्ण सोलापूर जिल्ह्याच्यावतीने या मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

## उच्चशिक्षित सरपंच मिळणे हे गावाचे भाग्य



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सांगोला :** महाराष्ट्रातील सर्वात श्रीमंत गाव आणि दर्जेदार डाळिंब उत्पादनासाठी जगाच्या नकाशावर वेगळी ओळख निर्माण केलेल्या अजनाळे ता. सांगोला ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी माजी आमदार दिपक साळुंखे पाटील यांच्या गटाच्या अनिता चंद्रकांत पवार यांची बिनविरोध निवड करण्यात आली. एम. ए. बी. एड शिक्षण झालेल्या सरपंच अनिता पवार यांच्या सत्कार प्रसंगी माजी शिवसेना आमदार दिपक साळुंखे पाटील यांनी गावच्या विकास कामात सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे अभिवचन दिले. नुकत्याच झालेल्या या सरपंच निवडीत अनिता पवार यांची निवड झाली. त्यांच्या सत्कारासाठी एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

» पान १ वरुन

## आ.जानकर राजीनामा देणार...

घोटाळा होण्याची शक्यता असल्याने मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनीही मतदान यंत्रावर संशय व्यक्त केला आहे. यामुळे विधानसभेची निवडणूक पारदर्शक व्हावी अशी मागणी होत आहे. विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात अनेक मान्यवर नेत्यांचा पराभव झाला. हा पराभव मतदान यंत्रातील घोटाळ्यामुळे झाला असल्याचा संशय व्यक्त करून अनेक राजकीय नेत्यांनी पुन्हा बॅलेट पेपरवर मतदान घेण्यात यावे अशी मागणी केली आहे. याबाबत अनेकांनी न्यायालयात याचिका दाखल केली आहे. आता निवडणूक आयोग कोणता निर्णय घेणार याकडे लक्ष लागले आहे.

» Selected

## बेशिस्त वाहनचालकांना केला दोन लाखांचा दंड



**सोलापूर :** सोलापूर शहरात लावण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे व ट्राफिक अंमलदार यांच्या माध्यमातून गुरुवार 17 जानेवारी रोजी मोबाईल टॉकिंगचे 72, ट्रिपल सीटचे 35, फ्रंट सीट रिक्षा चालवले 5, विना गणवेश रिक्षा चालवले 4 असे एकूण 116 ई-चलनाची दंडात्मक कारवाई पोलिसांकडून करण्यात आली. ही कारवाई सोलापूर शहरात विविध भागात करण्यात आली. तसेच या कारवाईतून एकूण 2, 19, 500/- रुपये रक्कम दंड करण्यात आला आहे.

## बेशिस्त वाहनचालकांना केला दोन लाखांचा दंड



**सोलापूर :** सोलापूर शहरात लावण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे व ट्राफिक अंमलदार यांच्या माध्यमातून गुरुवार 17 जानेवारी रोजी मोबाईल टॉकिंगचे 72, ट्रिपल सीटचे 35, फ्रंट सीट रिक्षा चालवले 5, विना गणवेश रिक्षा चालवले 4 असे एकूण 116 ई-चलनाची दंडात्मक कारवाई पोलिसांकडून करण्यात आली. ही कारवाई सोलापूर शहरात विविध भागात करण्यात आली. तसेच या कारवाईतून एकूण 2, 19, 500/- रुपये रक्कम दंड करण्यात आला आहे.

## सोयाबीनला हमीभाव, पण बारदान्याने केला वांदा



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** शासनाच्या वतीने नाफेडतर्फे राज्यभरात सोयाबीन हमीभाव केंद्रांवर सोयाबीन खरेदी सुरू आहे. शेतकऱ्यांना हमीभावाचा फायदा होत आहे. सोयाबीन खरेदीची अंतिम मुदत 31 जानेवारीपर्यंत आहे. परंतु राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये बारदान्याची प्रचंड कमतरता दिसून येत आहे. कोलकाता आणि इतर ठिकाणचा बारदाना महाराष्ट्रात दाखल होतो. परंतु यंदा बारदान्याची अनेकठिकाणी कमतरता जाणवली. त्यामुळे पिकांना हमीभाव देतानाच शासन-प्रशासनाने बारदाना देखील पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून देण्याची मागणी शेतकरी बांधवांकडून होत आहे.

## बैठक...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**सोलापूर:** भाजपचे आमदार सुभाष देशमुख यांनी दक्षिण सोलापूर तालुक्यातील विविध विभागांच्या अधिकाऱ्यांची शासकीय विश्रामगृह येथे महत्त्वपूर्ण बैठक घेतली. या बैठकीत तालुक्यातील विविध विभागांतील प्रगतीशील कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी सद्यस्थितीत चालू असणाऱ्या विविध विकासकामांवर तसेच नागरिकांना येणाऱ्या समस्यांबाबत चर्चा करण्यात आली. या बैठकीस भारतीय जनता पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, विविध गावातील सरपंच आणि शासकीय अधिकारी उपस्थित होते.

# आ. राजू खरे यांची दैनंदिनी जाहीर होत असल्याने हेलपटे बंद

## वेळेच्या बचतीमुळे तीन तालुक्यांतील मतदारांकडून विशेष कौतुक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**मोहोळ :** पंढरपूर विधानसभा मतदारसंघाचे कार्यतत्पर आमदार राजू खरे यानी आपल्या मतदार संघातील जनतेला आपल्याकडे येण्यासाठी विनाकारण हेलपाटे लागू नये. त्यामुळे विनाकारण वेळ वाया जाऊ नये. यासाठी एक उपक्रम हाती घेतला आहे. त्या उपक्रमांमधून आपल्या सकाळी उठल्यापासून ते संध्याकाळी झोपेपर्यंत पर्यंतचे दिवसभरातील दैनंदिनी वेळापत्रक थेट सोशल मीडियाच्या माध्यमातून जनतेपर्यंत पोहचविण्याची वेगळीच नव्याने प्रथा सुरू केली आहे. यामुळे मोहोळ मतदार संघात येत असलेल्या तीन तालुक्यातील समस्या मांडण्यासाठी येणाऱ्या जनतेचा मार्ग सुलभ झाला आहे.

मोहोळ विधानसभा मतदार संघात मोहोळ, उत्तर सोलापूर आणि पंढरपूर तालुक्यातील जनतेला समावेश आहे. या मतदार संघात नव्याने आमदार म्हणून राजू खरे निवडून आले आहेत. ते पंढरपूरचे रहिवासी असल्याने स्थानिक आमदार म्हणून त्यांचेकडे मतदार यांनी पाहिले आहे. आ . राजू खरे यांचे पंढरपूर तालुक्यात गोपाळपूर येथे त्यांचे मोठ फार्महाऊस आहेः. विशेषतः त्याच भागापासून मोहोळ विधानसभा मतदार संघ सुरू होत आहे. त्यामूळे या मोहोळ मतदार संघातील जनतेला संपर्क साधण्यासाठी हक्काचा स्थानिक आमदार मिळाला आहे. या नावाने निवडून आलेल्या आ. राजू खरे यांनी वरील तीनही तालुक्यातील लोकांना आपल्याशी भेटतांना हेलपाटे होत वेळ वाया जावू नये. यासाठीच आ. खरे यांनी आपला दिवसभरातील दौरा सोशल मीडियावर सोडण्याचां नवीन पायंडा सुरू केला आहे. यामुळे आ. खरे यांचं ठावठिकाणा माहिती होऊन भेटायला जावून आपल्या समस्या मांडणे अधिकचे सुलभ वाटू लागले आहे. यामुळे एक मतदार संघातील विकासकामे आणि वयक्तिक गाठीभेटीसाठी शिस्त लागल्याचे दिसून येऊ लागली आहे.

### स्थानिक आमदार असल्याने जनता खूष

मोहोळ विधानसभा मतदार संघात मागील पंधरा वर्षापासून आमदार हे बाहेरच्या भागात राहत असलेले होते. यामुळे त्यांचा सहवास लाभणे मुश्किलचे होते. आठवड्यातून एकदा भेटीचा जो दिवस असायचा त्यालाही बहुतांश वेळी कार्यक्रम असल्यानं कात्री लागत होती. त्यामूळे मतदार संघातील लोकांना झटपट भेटण्यासाठी मोठी पंचायत होत होती. आताचे हे आ. राजू खरे यांचे फिक्स ठिकाण मतदार संघातच आहे. याठिकाणी फार्महाऊस वरती आल्यावरही लोकांना हेलपाटे होवु नये म्हणूनच या ठिकाणी कोणत्या वेळेस भेटणे श्यक आहे. त्याची पूरेपूर सोशल मीडियावर माहिती सोडण्याचे काम स्विय सहाय्यक मोहन देडे यांचे मार्फत सुरु असल्याने आमदार आणि जनता यामधील अतूट नाते घट्ट बनत चालले आहे.

## अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना केवायसी करण्याचे आवाहन



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** 2024 सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे बार्शी तालुक्यातील नारी, घारी, पिंपळवाडी आणि ममदापूर या गावांतील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीसाठी पात्र ठरविण्यासाठी केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक असल्याचे तहसीलदार एफ. आर. शेख यांनी कळवले आहे. प्रशासनाच्या वतीने शेतकऱ्यांना लवकरात लवकर आपली KYC प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे, जेणेकरून त्यांना तत्काळ शासकीय मदतीचा लाभ मिळू शकेल.

## वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना कठोर कारवाई



**मोहोळ :** अपघातग्रस्तांना वेळेत मदत मिळाली तर त्यांचे जीव वाचू शकतात. जे लोक अपघातग्रस्तांच्या मदतीला धावून जातील त्यांना योग्य ते बक्षीस देऊन त्यांचा पोलीस प्रशासनाकडून सन्मान करण्यात येणार आहे. मात्र वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना कठोर कारवाईला सामोरे जावे लागणार " असल्याचे मत जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी इंचगाव (ता. मोहोळ) येथे व्यक्त केले.




## भूवैकुंठ स्मशानभूमीतील गॅस दाहिनी सुरू करा

# पंढरपूर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने नगरपालिकेला निवेदन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**पंढरपूर :** पंढरपूर शहरातील भूवैकुंठ स्मशान भूमीतील बंद अवस्थेत असलेली गॅस दाहिनी सुरू करण्यात यावी.

या मागणीचे निवेदन पंढरपूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ.प्रशांत जाधव यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने शहराध्यक्ष दिगंबर सुडके यांच्या वतीने देण्यात आले.

यावेळी रशीद शेख, सुनील जाधव, संजय म्हमाने, संजय सातपुते, सचिन सोलंकी, राजू वडतीले उपस्थित होते.

पंढरपूर शहरातील भूवैकुंठ स्मशानभूमी मधील गॅस दाहीनी गेली अनेक वर्षांपासून बंद अवस्थेत असल्याने सामान्य नागरिकांना अंत्यविधी करण्यासाठी लाकडाचा वापर करावा लागत आहे. यामुळे सामान्य नागरिकांना मोठा आर्थिक फटका सहन करावा लागत आहे. बंद अवस्थेत असलेली गॅस दाहिनी सुरू केल्यास सामान्य नागरिकांचा खर्च कमी होईल व पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही समतोल राखला जाईल. यामुळे पंढरपूर शहरातील स्मशानभूमीतील गॅस दाहीनी सुरू करावी. अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने पंढरपूर नगर परिषदेकडे करण्यात आली आहे.

पंढरी संचार



# जलशुद्धीकरणाच्या भावनेचा महाकुंभ



कुंभपर्वाबाबत पौराणिक आख्यायिका आहे, ती अशी : समुद्रमंथनाच्या वेळी अमृतकुंभ घेऊन धन्वंतरी वर आला, राक्षसापासून कुंभाला वाचवण्यासाठी संपूर्ण ब्रह्मांड फिरले या दरम्यान ज्या ज्या ठिकाणी कुंभ खाली ठेविला ती ठिकाणे तीर्थ झाली.'कुंभपर्व'नावाच्या पुण्यकारक ग्रहयोगाच्या निमित्ताने दर बारा वर्षांनी चार तीर्थक्षेत्रांच्या स्थानी हिंदू भाविकांचा जो मेळावा जमतो, त्यास कुंभमेळा असे संबोधले जाते. हा मेळावा प्रयागराज, हरद्वार, नासिक व उज्जयिनी (उज्जैन) या ठिकाणी भरतो.

**प्रत्येक ठिकाणचा कुंभयोग निरनिराळा असून तो पुढील प्रमाणे येतो :**

**प्रयाग : मकर राशीत चंद्र-सूर्य, वृषभ राशीत गुरू आणि अमावास्या तिथी असता**

**हरद्वार : गुरू कुंभ राशीत आणि सूर्य मेष राशीत असता**

**नासिक : गुरू सिंह राशीत आणि चंद्र-सूर्य कर्क राशीत असता**

**उज्जयिनी : सूर्य आणि गुरू अनुक्रमे तुला आणि वृश्चिक राशीत असता.**

प्रयागमधील कुंभपर्वात मकर संक्रांती, अमावास्या आणि वसंत पंचमी ही तीन उपपर्वे आहेत. त्यापैकी अमावस्या हे प्रमुख पर्व असून त्याला 'पूर्णकुंभ'हे नाव आहे गुरूला राशिचक्र भोगण्यास बारा वर्षे लागत असल्यामुळे, दर बारा वर्षांनी कुंभयोग येतो. कुंभपर्वाच्या वेळी प्रयागादी क्षेत्रांत स्नान केले असता, अनंत पुण्यलाभ होतो, ह्या भावनेने लाखो भाविक लोक तसेच शेकडो मठाधिपती व साधुसंत, आपापल्या घोडे, उंट, हत्ती इ. सरंजामासह त्या त्या ठिकाणी जमतात.

आस्था, विश्वास, सौहार्द आणि संस्कृतिचा मिलनाचे पवित्र पर्व म्हणजे"कुम्भ".ज्ञान आणि चेतना यांचे मंथन कुंभामद्धे व्हावे असे अध्याहृत आहे. महाकुंभाच्या गहनतेचा आणि आंतरीक अर्थाचा सखोल अभ्यास करत असताना हे लक्षात येते की हा मेळावा म्हणजे केवळ एक लोकांचे संमेलन नसून ती एक आंतरिक यात्रा आहे. कुंभ म्हणजे स्वतःचा शोध, आत्म्याचे शुद्धीकरण आणि आपल्या सामायिक मानवतेचा उत्सव आहे. कुंभमेळा शारीरिक विधी आणि समारंभांच्या पलीकडे जातो; हे एक आंतरिक तीर्थक्षेत्र आहे जिथे व्यक्ती, सज्जनांच्या विशालतेमध्ये, ईश्वराशी आपले संबंध शोधण्यासाठी येतात.



डॉ . सुमंत पांडे
(माजी कार्यकारी संचालक जलसाक्षरता केंद्र यशदा, पुणे)
पंढरी संचार

**कुंभाचे विज्ञान :**

भारतामध्ये हजारो वर्षाची कुंभाची परंपरा आहे. खरे तर ही नदी व्यवस्थापनाचे सूत्रच सांगते जणू. कुंभ मेळे हे गंगाजी, गोदावरी,आणि क्षिप्रा नदी तिरी भरतात. तसे पाहता मानवी वसाहती या नदी तिरी वासल्या आर्य देखील सिंधु नदीच्या खोऱ्यातच स्थिरावले. आणि विस्तारले असा इतिहास सांगतो. म्हणून खऱ्या अर्थाने नदी नीती,रिती आणि त्याच्या प्रबंधनाचेच सूत्र या कुंभ मेळयाच्या निमित्ताने असावे असे लक्षात येते.

भारतामध्ये अनादि काळापासून समाजाला अनुशासित करण्यासाठी वैज्ञानिक रिती आणि नीती ला धर्म, पाप, पुण्य आणि मर्यादा या सारख्या आस्थेशी जोडण्यात आले असावे. आणि समाजाला विज्ञानाच्या जटिल प्रक्रिया समजावून सांगण्यासाठी हा सोपा आणि प्रभावी मार्ग निवडला असावा.

**कुंभ माझ्यासाठी :**

अमृताचा अर्थ जो मृत नाही ते अ-मृत आणि अशा जिवंत जलाला राक्षसी प्रवृत्ती पासून वाचवण्यासाठी कधीकाळी दैवी शक्तीने स्वतःची प्राणची बाजी लावली होती आणि यामुळेच गंगा अमृतमयी झाली आणि ती अमृतमयी राहावी यासाठी च कुंभांची निर्मिती झाली. आज केवळ गंगा नाही तर अशा अनेक अमृतधारा आहेत, ज्या या राक्षसी प्रवृत्तीच्या अथवा राक्षसी पाशाच्या विळख्यात जखडलेले आहेत आणि त्यांनाही मुक्त करणे हे सर्व समाजाचे, शासनाचे,संत, महतांचे आदी कर्तव्य होय.

गंगा ही पृथ्वीतलावरील सर्वात पवित्र नदी होती, आहे, आणि राहील ही तथापे गंगेची अध्यात्मिक जीवनदायीनी आणि प्रदूषण नाशक शक्ती क्षीण झाली आहे, लोप पावण्याच्या अगदी काठावर आल्याचे जाणवते. मानवी हस्तक्षेपामुळे यात भरच पडत आहे. इंद्रायणी,भीमा, गोदावरी ई सर्व नद्या याचा प्रवृत्तीच्या शिकार झाल्या आहेत. शासनाच्या माध्यमातून यावर उपाययोजना होते आहे तथापि ती पुरेशी आहे असे नाही आणि म्हणून कुंभाच्या निमित्ताने आपण सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

कुंभ आणि वर्तमान : खरे पाहता कुंभ ही भारताची गौरवशाली परंपरा आहे ,आणि ही प्रकृतीच्या संरक्षणासाठी च होती. तथपि स्नानार्थी के कुंभाची मूळ संकल्पना विसरल्याने आजची स्थिति निर्माण झाली आहे.

कुंभ होत असलेल्या सगळ्याच नद्या गंगा, क्षिप्रा, गोदावरी या प्रदूषण, अतिक्रमण आणि शोषणाच्या बळी पडलेल्या आहेत. सबब कुंभ हे प्रतीकात्मक मानून, मी राहत असलेल्या ठिकाणच्या सर्व नद्या या माझ्या साठी गोदा, गंगेसमानच आहेत, तीला राक्षसी प्रवृत्तीपासून वाचवणे हे माझे आद्य कर्तव्य असे मानून कृतिशील राहीन हा पण करणे आवश्यक ठरते.

- कुंभ हे केवळ पवित्र स्नान नाही तर तेथे नदीला शुद्ध करण्याचे विज्ञान आहे हे लक्षात घ्यावे . तेथून स्नान करून शुचिर्भूत होवून येताना अंतर्मन आणि नदी शुद्ध करण्याच्या निर्धार करावा. याच निर्धाराने नद्यांची परिक्रमा हे सदर सुरू करण्यात आले आहे.
- नदी सर्वस्य मातर: नदी सर्वांची माता या उक्ती नुसार या सदरामध्ये विश्वा च्या आणि आपल्या नद्याचीही परिक्रमा व्हावी, तिचे दुख आणि त्याच्यावरचे उपचरी सामोरे यावेत हाच उद्देश्य आहे.

# महाकुंभमेळ्यातून चार लाख कोटींची कमाई ?

**प्रयागराजमध्ये भरलेल्या महाकुंभमेळ्यात देश-विदेशातील कोट्यवधी संत आणि भक्त जमले आहेत. महाकुंभाच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक महत्त्वासोबतच देशाच्या अर्थव्यवस्थेवरही त्याचा मोठा प्रभाव पडतो. लोक महाकुंभात श्रद्धेने डुंबत असताना अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार आहे. यंदाच्या महाकुंभमेळ्यामध्ये चार लाख कोटी रुपयांहून अधिक कमाई होऊ शकेल, असा अंदाज आहे.**

४५ दिवस चालणाऱ्या या महान उत्सवामध्ये संगमाच्या काठावर ४० कोटींहून अधिक लोक जमण्याची अपेक्षा आहे. उत्तर प्रदेश सरकारने महाकुंभसाठी सात हजार कोटी रुपयांच्या बजेटची तरतूद केली आहे. सुमारे चार हजार हेक्टरमध्ये आयोजित या महामहोत्सवाची सांगता २६ फेब्रुवारीला होणार आहे. या वर्षी आयोजित करण्यात आलेल्या महाकुंभामुळे उत्तर प्रदेशच्या अर्थव्यवस्थेत दोन लाख कोटी रुपयांची भर पडेल, असा अंदाज वर्तवला जात आहे. येथे जमणारे अंदाजे ४० कोटी लोक सरासरी ५,००० रुपये खर्च करतात. यातून राज्य सरकारला दोन लाख कोटी रुपयांचे उत्पन्न मिळणार आहे.

जानेवारी ते फेब्रुवारी दरम्यान अतिरिक्त खर्च अपेक्षित असताना, या अनियोजित आर्थिक कृतीमुळे नाममात्र आणि वास्तविक दोन्ही प्रमाणात GDP 1% पेक्षा जास्त वाढू शकतो. परिणामी, कुंभमेळ्याचा त्रैमासिक आणि वार्षिक GDP वाढीवर लक्षणीय प्रभाव पडेल असा अंदाज आहे. महा कुंभमेळ्यातील 16,000 कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून उल्लेखनीय परतावा मिळण्याची अपेक्षा आहे. सरकारला GST, प्राप्तिकर आणि इतर अप्रत्यक्ष करांमधून भरीव महसुलाची अपेक्षा आहे, एकूण कर संकलनात रु. 1 लाख कोटींहून अधिकचा अंदाज आहे. हे आर्थिक पुनरुज्जीवनासाठी एक शक्तिशाली उत्प्रेरक म्हणून महाकुंभची भूमिका अधोरेखित करते. पारंपारिक GDP आकडे या कार्यक्रमाचे व्यापक सांस्कृतिक आणि आर्थिक महत्त्व पूर्णतः कॅप्चर करू शकत नसले तरी, महाकुंभमेळा हा अल्पकालीन आर्थिक वाढ आणि दीर्घकालीन सामाजिक आणि सांस्कृतिक पुनरुज्जीवन दोन्ही ऑफर करून भारताच्या अद्वितीय आर्थिक चौकटीचा आधारशिला बनण्यास तयार आहे.

**देशाचा जीडीपीही वाढेल**

यंदाच्या महाकुंभमेळ्यात प्रति व्यक्ती सरासरी खर्च दहा हजार रुपयांपर्यंत पोहोचू शकतो. अशा परिस्थितीत दोन लाख कोटी रुपयांच्या कमाईचा आकडा चार लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचू शकतो. यासह नाममात्र आणि वास्तविक जीडीपी एक टक्क्याने वाढण्याची अपेक्षा आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी म्हटले आहे की २०१९ मध्ये प्रयागराज येथे झालेल्या अर्ध कुंभ मेळ्याने उत्तर प्रदेशच्या अर्थव्यवस्थेत १.२ लाख कोटी रुपयांची भर घातली होती. त्या वेळी सुमारे २४ कोटी भाविक आले होते. या वर्षी ४० कोटी भाविक येण्याची शक्यता असून, त्यातून दोन लाख कोटी रुपयांपर्यंत उत्पन्न अपेक्षित आहे.

**विदेशातूनही भाविकांचा ओघ**

यंदाचा हा श्रद्धेचा उत्सव विशेष आहे. कारण १२ वर्षांनंतर आयोजित होणाऱ्या या महाकुंभात १४४ वर्षांचा अद्भूत योगायोग घडत आहे. देशातूनच नव्हे, तर रशिया, अमेरिकेसारख्या देशांमधूनही भाविकांचा ओघ असेल. या काळात लोक पॅकेज्ड अन्न, पाणी, बिस्किटे, दिवे, तेल, अगरबत्ती, धार्मिक पुस्तके इत्यादींसह अनेक वस्तू खरेदी करतील. याशिवाय निवास आणि प्रवासावर मोठा खर्च होणार असल्याने राज्यासह देशाच्या अर्थव्यवस्थेला गती मिळेल.



# अनसेफ आयुष्य!

**रात्री अडीचच्या सुमाराला एका सेलिब्रिटीच्या बंद घरात कोणी अनोळखी शिरलाय, हे त्याच्याकडून सहा प्राणघातक वार झाल्यावर कळतं, या घटनेतून सामान्य नागरिकांचे जीवन किती सुरक्षित आहे याची कल्पना येईल. पुणे, मुंबई, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूरसारखी महानगरे कायदा आणि सुव्यवस्थेच्या कक्षात येतात की नाही, असा प्रश्न पडावा अशा घटना या शहरांमधून घडू लागल्या आहेत.**



**सुरक्षेची सगळी यंत्रणा कार्यरत असते का?**

हाय प्रोफाइल एरियामध्ये जशी सिसिटीव्ही यंत्रणा आपले काम चोख बजावेल याची काटेकोरपणे काळजी घेतली जाते, तशी चिंता सामान्य नागरिकांच्या बाबतीत घेतली जात नाही.

कैक वेळेस सार्वजनिक ठिकाणी अपराधिक घटना घडून गेल्यावर, सीसीटिव्ही यंत्रणा असूनही त्यात बिघाड झाला होता; तपास यंत्रणांना हा साक्षात्कार होतो, याची जबाबदारी कोणाची हा प्रश्न पडतो.

**तात्काळ सेवा खरेच उपलब्ध होते का?**

1. आणीबाणीच्या प्रसंगी संपर्क करायचे फोन नंबर कधी चालू नसतात.

2. पलीकडून योग्य वागणूक मिळत नाही. तर बऱ्याचवेळा तक्रार देणाऱ्याचीच अपराध्यासारखी चौकशी केली जाते.

3. अपराधिक घटना घडत असताना किंवा घडून गेल्यावर संबंधित सुरक्षा यंत्रणांकडून योग्य प्रतिसाद मिळत नाही हे वास्तव आहे.

4. बऱ्याचवेळा अपराधिक घटना कोणत्या पोलीस स्टेशनच्या अधिकार क्षेत्रात येते यात संभ्रम निर्माण केला जातो. तोवर घटना घडून आरोपी फरार झालेले असतात.

**सामान्यांना योग्य वैद्यकीय मदत मिळते का?**

मान्यवर राजकीय व्यक्ती, किंवा सर्वमान्य सेलिब्रिटींना जशी विना चौकशी, विना आडकाठी त्वरित वैद्यकीय मदत मिळते हे आपण पाहतो, ती सर्वसामान्य नागरिकांना मिळत नाही. इमर्जन्सीमध्ये वैद्यकीय मदत किंवा उपचार देण्यापूर्वी पैशाची मागणी करणे बेकायदेशीर आहे, हे नियम प्रत्यक्षात पाळले जात नाहीत.

**तपास यंत्रणांद्वारे हालचालींमध्ये सावत्रभाव :**

1. सर्वमान्य व्यक्तिंसंबंधी अपराधांचा तपास करायला पोलीस यंत्रणेच्या 15 - 15 टीम त्वरित गठित करून कार्यरत होतात, आरोपी एक दोन दिवसात पकडुन रातोरात कोर्टात हजर केले जातात.


2. सामान्यांच्या बाबतीत, तक्रार दाखल करतानाच प्रश्नांची सरबत्ती केली जाते. मग कुठे जाऊन तपासाला सुरुवात होते.

पोलिसांचा कार्यक्षेत्रातील वचक:

1.पूर्वी पोलीस म्हटले की, अपराध्यांना एका करारी व्यक्तिमत्वाची दहशत वाटायची. आज ते दुचाकीवर डबल सीट जाताना दिसतात, सामान्य नागरिकांमध्ये त्याने जास्त दहशत पसरते.

2.पूर्वी आपल्या कार्यक्षेत्रात पोलिसांची नियमित गस्त असायची. आज गस्त सोडून द्या तक्रार नोंदवून घ्यायला संबंधित जागेवर नसतात. सामान्यांच्या सुरक्षेचे हे हाल आहेत.

3. कडक कायद्यांचा अभाव आणि अपराध्यांना त्वरित जामीन मिळण्याची सुविधा या दोन प्रमुख गोष्टींमुळे अपराधिकवृत्ती फोफावते.



हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ **http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com**

» Selected

## युवतींच्या रक्षणासाठी युवकांचा पुढाकार कौतुकास्पद -आण्णा हजारे



जातेगाव खुर्द ता. शिरुर येथील संजय तांबे ज्येष्ठ समाजसेवक आण्णा हजारेंशी चर्चा करताना.

**शिक्रापूर :** सध्या युवतींबाबत घडणाऱ्या घटना विचारात घेता युवतींच्या सुरक्षिततेची गरज असल्याने काही तरुण युवतींना मोफत लाठीकाठीचे प्रशिक्षण देत असल्याची बाब चांगली असून युवतींच्या रक्षणासाठी युवकांचा पुढाकार कौतुकास्पद असल्याचे सांगत ज्येष्ठ समाजसेवक आण्णा हजारे यांनी संजय तांबे या युवकाचे कौतुक केले आहे. जातेगाव खुर्द ता. शिरुर येथील संजय तांबे या युवकाने किसान ऑल स्पोर्ट्स करिअर अकादमीच्या माध्यमातून मुलींच्या संरक्षणाची गरज ओळखून संजय तांबे व मिलिंद ठोके या दोघांनी शिरुर तालुक्यातील शाळा व महाविद्यालयात मुलींना मोफत लाठी काठी व कराटे प्रशिक्षण सुरु केले असताना शिरुर तालुक्यातील तीन हजार हून आशिक युवतींनी त्याचा लाभ घेत युवती स्वयंभू झाल्या असताना सध्या काही शाळांमध्ये प्रशिक्षण सुरु आहे, तर नुकतेच किसान ऑल स्पोर्ट्स करिअर अकादमीचे प्रमुख संजय तांबे व मिलिंद ठोके यांनी ज्येष्ठ समाजसेवक आण्णा हजारे यांची भेट घेत त्यांना याबाबत माहिती दिली असता आण्णा हजारेंनी संजय तांबे यांच्या या अनोख्या उपक्रमाचे कौतुक करत सदर मुलींना लाठीकाठी प्रशिक्षण हि चळवळ व्हावी असे मत व्यक्त केले.

## जेजुरी ज्येष्ठ नागरिक संघाच्यावतीने हळदी-कुंकू व तिळगूळ समारंभ



**जेजुरी :** येथील जयमल्हार ज्येष्ठ नागरिक संघटनेच्या वतीने संक्रांती सणाचे औचित्य साधून महिलांसाठी हळदी कुंकू व तिळगूळ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला मोठा प्रतिसाद मिळाला. जेजुरी येथील जयमल्हार ज्येष्ठ नागरिक भवनात संघटनेचे अध्यक्ष शामकाका पेशवे,उपाध्यक्षा उषाताई आगलावे सचिव मोहिनी धोत्रे ,नानी आगलावे व कार्यकारणीच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाला शहरातील महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.यावेळी महिलांना संक्रांती निमित्त भेटवस्तू देण्यात आल्या. ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने दरवर्षी ज्येष्ठांसाठी आरोग्य शिबिरे,धार्मिक सहली,व्याख्याने,गुणवंत विद्यार्थी व विविध क्षेत्रात उल्लेख कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देवून सन्मान,राष्ट्रीय सण,तिळगूळ समारंभ आदी उपक्रम राबविले जात असल्याचे पेशवे यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे नियोजन संघटनेचे पदाधिकारी पांडुरंग कोरपड, सुहास बारभाई, अनंतराव जगताप, नंदकुमार निरगुडे आदींनी केले.

## होम मिनिस्टर कार्यक्रमाचे आयोजन

**बारामती :** डोर्लेवाडी (ता. बारामती) येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ यां`च्या संयुक्त जयंतीनिमित्त व मकर संक्रातीचे औचित्य साधून आयोजित केलेल्या होम मिनिस्टर कार्यक्रमात तन्मई हनुमंत हरिहर यांनी प्रथम क्रमांक मिळविला. प्रा. अंकुश खोत व कुटुंबियांना सिंधुताई सपकाळ जीवन गौरव पुरस्कारने गौरविण्यात आले.

येथील समस्त ग्रामस्थ व संभाजी ब्रिगेड संघटनेच्या वतीने संयुक्त पुरस्कार वितरण व होम मिनिस्टर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. चंदूकाका सराफ सुवर्ण पेढीचे प्रमुख किशोरशेठ शहा, मार्तंड देवस्थान जेजुरीचे मुख्य विश्वस्त अभिजीत देवकाते, सहायक मोटार वाहन निरीक्षक हर्षदा आबासाहेब खारतोडे, भगिनी मंडळ बारामतीच्या अध्यक्षा आरती नितीन सातव, शिवानी अभिजीत देवकाते, सरपंच सुप्रिया नाळे, उपसरपंच राणी नेवसे, विद्या प्रतिष्ठानचे उपप्राचार्य अंकुश खोत, खरेदी विक्री संघाचे माजी संचालक भगवान क्षीरसागर आदी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. यावेळी सी.ए.च्या परीक्षेत यश मिळविलेली योगिता संजय ससाणे हिचा सत्कार करण्यात आला.तसेच एकत्र कुटुंब पद्धती व सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे प्रा. अंकुश खोत व कुटुंबियांचा सिंधुताई सपकाळ जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.यावेळी व्याख्यात्या करिश्मा गावडे यांनी होम मिनिस्टर कार्यक्रम घेतला.यामध्ये त्यांनी खेळाच्या माध्यमातून विविध विषयांवर जनजागृती व महिलांचे मनोरंजन केले.या कार्यक्रमात प्रथम क्रमांक तन्मई हनुमंत हरिहर,द्वितीय क्रमांक सायली संतोष म्हेत्रे, तृतीय क्रमांक सुनंदा राजेंद्र जमदाडे, चतुर्थ क्रमांक अर्चना तुकाराम भोपळे, पंचम क्रमांक रुपाली दत्तात्रय नाळे व सहावा क्रमांक अश्विनी पांडुरंग गाडे यांनी मिळविला. विजेत्यांना सोन्याची ठुशी, रेफ्रिजरेटर, टीव्ही संच,कुलर, मिक्सर, छताचा पंखा सोन्याची नथ आदी बक्षिसे देण्यात आली. मनोज काळोखे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले

# डॉ एम के इनामदार व डॉ साधना इनामदार समाजरत्न पुरस्काराने सन्मानित

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** डॉ.एम.के.इनामदार व डॉ. साधना इनामदार या दांपत्यास समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. जिजाऊ,सावित्रीमाई फुले, फातिमा शेख यांच्या जयंती निमित्त व पत्रकार दिनानिमित्त, क्रांतीज्योती विचारमंच महाराष्ट्र राज्य व राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या विद्यमाने विविध क्षेत्रातील मान्यवरांना हर्षवर्धन पाटील व अकलूज येथील प्रसिद्ध डॉक्टर एम.के.इनामदार यांच्या हस्ते पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. संत सावतामाळी मंदिरात हा कार्यक्रम पार पडला.

सामाजिक काम करणाऱ्या समाज सेवकांना महापुरुषांच्या नावाने पुरस्कार देऊन सन्मानित करण्याचा उपक्रम माजी नगरसेवक पांडुरंग शिंदे यांचा स्तुत्य आहे, अशा



इंदापूर डॉक्टर एम के इनामदार यांना समाज भूषण पुरस्काराने सन्मानित करताना माजी मंत्री हर्षवर्धन पाटील व मान्यवर

उपक्रमामुळे सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन मिळते असे गौरवोद्गार राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी व्यक्त केला.

या वेळी बोलताना डॉ.एम. के.इनामदार म्हणाले की, गेल्या अनेक वर्षापासून आपण पांडुरंग शिंदे यांचे सामाजिक कार्य जवळून पहातो आहे. आमच्या परिवाराच्या शुभेच्छा त्यांच्या पाठीशी आहेत. या वेळी पांडुरंग शिंदे,महात्मा फुले विचार अभियानचे संयोजक संपतराव जाधव, इंदापूर बार असोसिएशनचे ॲड.गिरीश शहा, प्रा.कृष्णा ताटे, बाबजी भोंग व इतरांची भाषणे झाली.

या कार्यक्रमात डॉ.एम. के.इनामदार व डॉ. साधना इनामदार या दांपत्यास समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. डॉ. दत्तात्रय गार्डे, डॉ. नामदेव गार्डे, उरुळी देवाची गावच्या सरपंच महानंदा सातव, काटी गावचे सरपंच सोमनाथ मोहिते,जय नर्सिंग इन्स्टिट्यूटचे जयवंत नायकुडे, उरुळी कांचनचे माजी सरपंच पोपटराव बोराटे, सहजपूरच्या सरपंच सविता मेहेर, इंदापूर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड.गिरीश शहा,नायब तहसीलदार पुजा मोहिते,म. फुले विचार अभियानचे संयोजक संपतराव जाधव, माजी विभागीय पोलीस अधिकारी अमोल रामचंद्र मोहिते, सहाय्यक पोलिस निरीक्षक शंकर राऊत,सातारा जिल्हा माळी संघटनेचे अध्यक्ष जयसिंग लोखंडे, डॉ. रेश्मा शेख, यांना समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

माधुरी लडकत, विनोद रासकर, अमित यादव, रविंद्र वाघमारे, वंदना भोंग, अनिशा लव्हे, रेश्मा रास्ते, सोनाली बनसोडे, काजल शेळके, ज्योती राजेंद्र बनसोडे, वृषाली बनसोडे, आर. के पांडुरंग बनसोडे,साक्षी बनसोडे, भाग्यश्री नगरे आदि पोलीस अधिकारी कर्मचाऱ्याना सावित्रीमाई फुले पुरस्कार देण्यात आला.

## किरकोळ वादातून सख्ख्या भावांमध्ये मारहाण

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** धामारी ता. शिरुर येथील दोघा सख्ख्या भावांमध्ये जमिनीच्या किरकोळ वादातून दगडाने हाणामारी करत जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना घडल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे शिवाजी बाबुराव डफळ, अंगद शिवाजी डफळ, कमल शिवाजी डफळ यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

धामारी ता. शिरुर येथील रामदास डफळ व शिवाजी डफळ या सख्ख्या भावांमध्ये जमिनीचा वाद सुरु असून शिवाजी डफळ याने शेजारील स्वप्नील डफळ यांच्या शेतातून पाणी घेऊन पिकांना देत असताना रामदास याने स्वप्नील याला आमच्या मध्ये जमिनीचा वाद आहे माहित असून तू शिवाजीला पाणी का दिले असे म्हटले असता शिवाजी सह त्याच्या मुलाने रामदासला शिवीगाळ, दमदाटी करत दगडाने मारहाण करत जखमी केले, दरम्यान रामदासची पत्नी मध्ये आली असता आतील देखील ढकलून देत शिवाजी याने जीवे मारण्याची धमकी दिली, याबाबत रामदास बाबुराव डफळ यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली आहे.

# आळंदीत कॅन्सर प्रतिबंधात्मक जनजागृती हळदी-कुंकू उत्साहात

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** येथील श्री नरसिंह सरस्वती मेडिकल फाउंडेशन संचलित इंद्रायणी हॉस्पिटल आणि कॅन्सर इन्स्टिट्यूट, आळंदी यांच्या वतीने आयोजित हळदी कुंकू समारंभात कॅन्सर विषयी जनजागृती व प्रतिबंधात्मक कार्यक्रम, मोफत तपासणी व उपचार या उपक्रमांतर्गत व्याख्यानास महिलांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

या प्रसंगी या सामाजिक बांधिलकीतून राबविलेल्या उपक्रमास आळंदी शहरातील महिला बचत गट पदाधिकारी, सांस्कृतिक, राजकीय, सामाजिक, महिला, शिक्षक, इतर क्षेत्रातील महिला - पुरुषांनी भरभरून प्रतिसाद मिळाला. या उपक्रमात जनजागृती करीत पुढील कार्यक्रम घरोघरी जाऊन सर्वे (हर - घर सर्वे) उपक्रम राबवून कॅन्सर विषयी जनजागृती करणे व मोफत उपचार आणि तपासणी करून आळंदीकरांचे आरोग्य जपणे हा उद्देश नक्कीच साध्य होईल असा आशावाद डॉ. नितीन गोसावी यांनी व्यक्त केला. हर - घर सर्वे उपक्रaमाची सुरुवात पुढील



आठवड्यात होणारा असल्याचे जाहीर करण्यात आले. आळंदी शहरातील सर्व प्रभागात हा सर्व्हे होणार असून नागरिकांनी घरभेटीसाठी आलेल्या सर्व्हेचे पथकास माहिती देऊन सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

यासाठी समस्त आळंदीकर रहिवासी यांनी मार्गदर्शन, सकारात्मक मदत होईल अशी अपेक्षा यावेळी श्री नरसिंह सरस्वती मेडिकल फाउंडेशन विश्वस्त डॉ. सोनाली देशमुख यांनी व्यक्त केली. यावेळी विविध सेवाभावी संस्थांचे पदाधिकारी यांनी मार्गदर्शन केले. यात ज्ञानेश्वर महाराज चरित्र समिती अध्यक्ष प्रकाश काळे, शिवसेना शाखा प्रमुख रोहिदास कदम, आळंदी जनहित फाउंडेशन कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर, राजेश नागरे, श्रीधर घुंडरे, महिला बचतगट महासंघ अध्यक्षा सुवर्णा काळे, सामाजिक कार्यकर्त्या पुष्पांताई कुऱ्हाडे, माजी नगराध्यक्षा वैजयंता उमरगेकर, संगीता फफाळ, मंगला हुंडारे आदींसह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्रकाश काळे म्हणाले, कुटुंब प्रमुख महिला कुटुंबातील सर्वांची काळwatजी घेतात. मात्र आपल्या स्वताच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. महिलांनी आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू नये. वेळचे वेळी दवाखान्यात जाऊन आपल्या आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन काळे यांनी केले.

आळंदीकरांचे श्री नरसिंह सरस्वती मेडिकल फाउंडेशन संचलित इंद्रायणी हॉस्पिटल आणि कॅन्सर इन्स्टिट्यूट यांच्या वतीने आभार मानण्यात आले.

## आदिती तटकरेंकडून महिला अधिकाऱ्याच्या कामाचा गौरव

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** रांजणगाव गणपती (वार्ताहर) दि. १८ रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या महिला अधिकाऱ्याने राज्याच्या मंत्री आदिती तटकरे यांना वाहन कोंडीतून रस्ता मोकळा करून दिल्याने आदिती तटकरे यांनी वाहनातून खाली उतरून त्यांच्या कामाचा गौरव केला. व त्यांच्या या कामाचे कौतुक होत आहे

चार चाकी वाहने चालवण्यासाठी महिला देखील आता मागे नाही. महाराष्ट्रात पोलीस खात्यात असलेल्या सरकारी वाहनांवर महिलांची वाहन चालक म्हणून मोठ्या प्रमाणावर भरती होत आहे. अशातच महाराष्ट्र राज्याच्या मंत्री आदिती तटकरे यांनी रांजणगाव एमआयडीसी पोलिस ठाण्यात असलेल्या एका महिला वाहन चालकाचे विशेष कौतुक केले आहे.

पुणे अहिल्यानगर महामार्गावर असलेल्या पोलीस ठाण्याच्या हद्दीतून व्हीआयपी,मंत्री, न्यायाधीश किंवा सरकारी महत्त्वाचे वाहने जात असताना स्थानिक पोलीस ठाण्याची सरकारी वाहन स्वतःच्या हद्दीतून पायलेटिंग करत दुसऱ्या हद्दी

पर्यंत जात असतात. अशातच पुणे जिल्ह्याच्या शिरूर तालुक्यातील



रांजणगाव एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या हद्दीतून महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालविकास विभागाच्या मंत्री आदिती तटकरे या जात असताना नेहमीप्रमाणे चालक शुभांगी लबडे या सरकारी वाहन घेऊन

पायलेटिंग करण्यासाठी गेल्या होत्या. शुभांभी यांनी वेळेच्या आत मंत्री महोदयांना योग्य रस्त्यानी वेळत घेऊन गेल्या. मात्र मंत्री आदिती तटकरे यांना आपल्या पायलेटिंग करणाऱ्या वाहनांच्या ताफ्यात महिला वाहन चालक असल्याचे समजताच त्यांनी संपूर्ण ताफा थांबवण्यास सांगितले. रांजणगाव येथे कार्यरत असणाऱ्या पोलीस वाहन चालक शुभांगी लबडे यांना वाहनाच्या खाली बोलावून मंत्री आदिती तटकरे यांनी वाहन चालविण्याच्या कलेचे कौतुक केले. या घटनेमुळे पोलीस वाहन चालक शुभांगी यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## शाळा कॉलेजेसमध्ये रोडरोमीओंचा धुडगूस

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** पुरंदर तालुक्यातील विविध शाळा कॉलेजेसमध्ये रोडरोमीओंचा धुडगूस चालू असुन शाळा कॉलेजेस सुटण्याच्या व भरण्याच्या वेळेस रोडरोमीओ सुसाट वेगाने गाडी चालवत असतात. शाळा कॉलेजेस नव्हे तर क्लासेस जवळ देखील हे रोडरोमीओ सारखेच फिरत असतात मुलिंना टोमने मारणे किंवा अंगावर दुचाकी घालण्याचा प्रयत्न करणे

अशा रोडरोमींचा पोलिस प्रशासनाने बंदोबस्त करणे गरजेचे आहे. या पुर्वी निर्भय पथक कार्यरत होते त्या काळात रोडरोमींना चांगलाच चाप बसला होता परंतु शासकीय अधिकारी बदलले की स्थानिक पातळीवर देखील याचा परिणाम होतो पोलिस प्रसासनाचा वचक राहिला नसल्याचे स्पष्ट दिसुन येते. महिला पोलिस अधिकारी यांनी पुन्हा निर्भय पथक तयार करून ते कार्यरत करुन मुलींना होणारा त्रास कमी करण्याची गरज आहे.

सासवड व परिसरात अनेक शाळा कॉलेजेस क्लासेस आहे या ठिकाणी फिरती पथके करून रोडरोमींचा चांगला बंदोबस्त करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. सकाळी लवकर खाजगी क्लासेस असतात त्या मुळे मुला मुलींना लवकरच उठून क्लासला जावे लागते काही पालक आपल्या मुलांना दुचाकी वर क्लासेस असतील तिथे सोडतात परंतु परगावातुन येणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थिनी यांना पायपीट करावी लागते.

## जराडवाडीत भरदिवसा, बंद घर फोडून चोरी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** जराडवाडी( ता. बारामती) येथे भर दिवसा, भर चौकातील बंद घराचे कुलूप - कोयंडा तोडून घरातील तब्बल १७ लाख २० हजार रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना बुधवारी ( ता. १५ ) दुपारी दरम्यान घडली. याबाबत बारामती तालुका पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्धात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घरमालक अशोक रघुनाथ जराड यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, येथील अशोक रघुनाथ जराड यांचे घर गावठाण मधील चौकात आहे. गुरुवारी सकाळी अशोक जराड हे कामानिमित्त बाहेरगावी गेले होते. व इतर कुटूंबिय घराला कुलूप लावून



### होणाऱ्या सुनेच्या दागिन्यांची देखील चोरी

● मुलाचे लग्न जमल्यानंतर होणा-या सूनेसाठी सोन्याचे दागिने हवेत म्हणून जराड कुटूंबियांनी दागिने करुन घरात ठेवले होते. तसेच त्यांची मुलगी लग्न होवून सासरी गेली आहे. मात्र तिने देखील आपले दागिने माहेरी ठेवयाला दिले होते. व त्यांची आई व पत्नीचे दागिने देखील पेटीत ठेवण्यात आले होते. सर्वच दागिने चोरीला गेले आहे.

शेतात गेले होते.

दुपारच्या वेळीला अज्ञात चोरट्यांनी बंद घराचे कुलूप कोयंडा तोडून घरात प्रवेश मिळविला. व घरातील लोखंडी पेट्या तोडून त्यातील १३ लाखाचे सोन्यांचे दागिने व ४ लाख रुपयांची रोख रक्कम असा ऐवज लंपास केला. या सोन्याच्या दागिन्यामध्ये मंगळसूत्र, बोटातील अंगट्या, कानातील खडे, सोन्याची साखळी, गळ्यातील सोन्याचा हार आदीचा समावेश होता. चोरी केल्यानंतर अज्ञात चोरट्यांनी घरात पेट्या व त्यातील कपडे आस्थाव्यस्त फेकून दिले आहे. भरदिवसा घडलेल्या या घटनेनंतर परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

घटनेनंतर सायंकाळी जराड कुटूंबिय घरी आल्यानंतर घराचे कुलूप कोयंडा तोडून चोरी झाल्याचे लक्षात आल्यानंतर जराड यांनी तालुका पोलिसात फिर्याद दिली आहे. दरम्यान, आज (ता.१६) सकाळी तालुका पोलिस स्टेशनचे पोलिस उपनिरीक्षक धनश्री भगत , बबन साळुंके यांनी घटनास्थळाला भेट देवून घटनेचा पंचनामा केला.

## जयवंतराव सावंत वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

# निवासी श्रमसंस्कार शिबीर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मौजे-उदाची वाडी, तालुका-पुरंदर येथे 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे राष्ट्रीय सेवा योजना आणि जयवंत शिक्षण प्रसारक मंडळा चे जयवंतराव सावंत वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय यांच्या वतीने सोमवार दि. ६ जानेवारी २०२५ ते रविवार दि. १२ जानेवारी २०२५ या कालावधीत सात दिवसांचे रा.से.यो विशेष हिवाळी निवासी श्रमसंस्कार शिबिर यशस्वीरीत्या संपन्न झाले. या शिबिराचा विषय 'माझ्या भारतासाठी तरुणाई व डिजिटल साक्षरतेसाठी तरुणाई' हा होता. या शिबिरामध्ये रा.से.यो च्या स्वयंसेवकांनी विविध उपक्रम राबवून समाजसेवेचा आदर्श घालून दिला. गावकऱ्यांसाठी सायबर सुरक्षा, सर्पदंश, डिजिटल साक्षरता या



विषयावर पथनाट्य सादर करण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांसाठी कौशल्य विकास, जलसंवर्धन, विद्यार्थी विकास व महिलांचे आरोग्य या विषयावर व्याख्याने आयोजित करण्यात आली. रा.से.यो च्या स्वयंसेवकांनी श्रमदानातून गावातील सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता व वृक्षरोपण यासारख्या उपक्रमावर विशेष भर देण्यात आला. याचबरोबर शाळा व मंदिराची स्वच्छता करण्यात आली. ज्यामुळे सार्वजनिक ठिकाणांना नवे सौंदर्य लाभले. या शिबिरादरम्यान गावकऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विद्यार्थ्यांना भरभरून सहकार्य केले. तसेच शनिवार दि. ११ जानेवारी रोजी आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते.

## शिरुर तालुक्यातील ४० शाळांसाठी उपक्रम

# कैलास सत्यार्थी फाउंडेशनकडून स्क्रीन प्रोजेक्टर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** शिरुर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढ व विकासासाठी कैलास सत्यार्थी फाउंडेशन चा पुढाकाराने शिरुर तालुक्यातील तब्बल चाळीस शाळेंना स्क्रीन प्रोजेक्टर व संगणक साऊंड सिस्टम देण्यात आली आहे.

कान्हूर मेसाई ता. शिरुर सह शिरुर तालुक्यातील तब्बल चाळीस शाळेंना कैलास सत्यार्थी चिल्ड्रन्स फाउंडेशनच्या वतीने विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीस चालना मिळावी आणि तंत्रज्ञानाचा वापर अध्यापनात



**शिक्रापूर :** कान्हूर मेसाई ता. शिरुर शाळेस साहित्य भेट देताना पदाधिकारी.

सुलभतेने करता यावा या हेतूने स्क्रीन प्रोजेक्टर, एक संगणक व साऊंड सिस्टम आदी साहित्य देण्यात आले आहे, याप्रसंगी सुभाष गतखाणे, अकाउंट ऑफिसर प्रज्वल थोपटे, प्रोजेक्ट ऑफिसर अमोल राठोड, असिस्टंट ऑफिसर मयुरा दळवी, स्वाती थोरात, सचिन थोरात, तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष योगेश पुंडे, उपाध्यक्षा विद्याताई ननवरे, ज्ञानेश्वर ननवरे, समाजसेवक शहाजी दळवी, माजी उपसरपंच दिपक तळोले, अनिल चौधरी, केंद्रप्रमुख सुनील जोशी, मुख्याध्यापक किसन हारपुडे यांसह आदी शिक्षक व पदाधिकारी उपस्थित होतेस, दरम्यान समाजसेवक शहाजी दळवी यांनी सर्वांचे आभार मानले.

## At a Glance

### सायबर गुन्ह्यांच्या संदर्भात भारत-अमेरिका करार

**नवी दिल्ली :** भारत आणि अमेरिका संबंध अधिक बळकट होण्याच्या दृष्टीने वाटचाल सुरू आहे. दोन्ही देशात सायबर आणि डिजिटल गुन्हेगारीबाबतची माहिती देवाणघेवाण संबंधी काल (दि.१८) महत्त्वपूर्ण करार पार पडला. भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने नुकतीच माहिती दिल्याचे वृत्त एएनआयने एक्स अकाऊंटवरून दिले आहे. "गुन्हेगारी तपासात सायबर धोक्याची गुप्तचर यंत्रणा आणि डिजिटल फॉरेन्सिक्सवर सहकार्य आणि माहितीच्या देवाणघेवाणीसाठी भारत-अमेरिका एकत्र आले आहेत," त्यांनी सायबर गुन्ह्यांच्या तपासाबाबत सामंजस्य करारावर भारत आणि अमेरिकेने स्वाक्षरी केल्याचे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी ट्विट केले.

### सांगलीतआढळले ६२ कुष्ठरोग बाधीत

**सांगली :** सांगली जिल्ह्यात शोध अभियानात ६२ कुष्ठरोग बाधित रुग्ण आढळून आले असून, यापैकी २८ रुग्ण असंसर्गित असल्याची माहिती आढावा बैठकीत देण्यात आली. जिल्ह्यात कुष्ठरोगाचे प्रमाण अधिक असल्याने निर्मूलन मोहीम अधिक प्रभावीपणे राबविण्यात यावी, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी धोडमिसे यांनी केले. राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत सांगली जिल्ह्यात कुष्ठरोग शोध अभियान दि. ३१ जाने. ते दि. १४ फेब्रु.कालावधीत राबविण्यात येणार आहे.

### आम्हाला कुणबी आरक्षण नको -खा. नारायण राणे

**रत्नागिरी :** मराठा समाजातील कुठलाही माणूस स्वतःला कुणबी म्हणवून घेत नाही. आम्हाला कुणबी मराठा आरक्षण नको आहे, असे खासदार नारायण राणे यांनी पुन्हा एकदा ठणकावून सांगितले. अखिल भारतीय मराठा फेडरेशनच्या अधिवेशनासाठी ते रत्नागिरीमध्ये आले होते. त्यावेळी पत्रकारांशी बोलताना त्यांनी आपले मत पुन्हा एकदा तेवढ्याच ठामपणे मांडले. घटनेच्या 15 आणि 16 (4) या कलमांमध्ये जी तरतूद आहे त्यानुसार सर्वेक्षण करून त्या समाजात मागासलेपणा आढळल्यास आरक्षण देण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे. त्यानुसार राज्य सरकारने मराठा समाजाला हे आरक्षण द्यावे, असे आपले मत असल्याचे त्यांनी सांगितले.

# लाडक्या बहिणींना कारवाईची भीती!

## ४ हजार महिलांनी अर्ज मागे घेतले : योजनेला भरपूर प्रतिसाद

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महिलांच्या सक्षमिकरणासाठी महायुती सरकारने राज्यात लाडकी बहीण योजना आणली. या योजनेला भरभरून प्रतिसाद मिळाला. मोठ्या प्रमाणात महिलांनी अर्ज केले. मात्र, निकषात बसत नसतांना देखील काही महिलांनी या साठी अर्ज केले. आता अशा अर्जदारांची तपासणी करण्यासाठी राज्य सरकार फेरतापासणी करण्याच्या विचारात आहे. त्यापूर्वी अशा अर्जदारांना लाभ सोडण्याचे आवाहन केले होते. त्यामुळे कारवाई होण्याच्या भीतीने आता स्वत:हून महिला अर्ज करून या योजनेचा लाभ सोडत आहेत. राज्यात आतापर्यंत ४ हजार महिलांनी अर्ज करून या जोजनेचा लाभ सोडून दिला आहे. विधानसभा निवडणुकीनंतर लाडकी बहीण योजनेने अर्ज व डॉक्युमेंटची फेरतपासणी होणार अशी चर्चा सुरू आहे. या योजनेच्या लभाबाबत काही तक्रारी सरकारला मिळाल्या. अनेकांनी पात्र नसतांना या योजनेचा लाभ घेतल्याचे पुढे आले. त्यामुळे त्या ठिकाणी अर्जांची फेरतपासणी सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे राज्य सरकारने देखील संपूर्ण राज्यात लाभार्थी महिलांची सरसकट फेरतपासणी करण्याच्या विचारात आहे.

त्यामुळे चार हजार महिलांनी फेरतपासणी आधी आम्हाला या योजनेचा लाभ नको असं म्हणत अर्ज दाखल करत यातून त्यांचं नाव मागे घेतले आहे. या संदर्भात राज्याच्या महिला व बालविकास विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने माहिती दिली आहे. अर्जांची पडताळणी झाली तर अपात्र ठरून कारवाई होईल तसेच मिळालेले पैसे परत घेतले जाईल या भीतीने हे अर्ज मागे घेतले जात आहे.



### कारवाईच्या भीतीने अर्ज माघारी घेण्यास सुरुवात

● सरकारने अद्याप फेरतापासणी सुरू केलेली नाही. मात्र, ही तपासणी सुरू होईल या भीतीने आधीच काही महिलांनी अर्ज माघार घेण्यास सुरुवात केली आहे. आता पर्यंत राज्यात तब्बल ४ हजार महिलांनी अर्ज स्वत:हून अर्ज मागे घेतल्याची माहिती आहे. या पूर्वी घेतलेल्या लाभाची वसूली व कारवाई होण्याच्या भीतीने ही अर्ज मागे घेतल्याचे बोलले जात आहे. पात्रता व निकषात न बसणाऱ्या महिलांनी हे अर्ज मागे घेतले आहेत. निवडणुकी आधी लाडकी बहीण योजने सर्वांना सरसकट पैसे मिळाले होते. मात्र, निवडणुकीनंतर फेरतपासणी केली जाण्याची चर्चा आहे.

### लाभ सोडण्याचे सरकारचे आवाहन

● 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेतील अपात्र महिलांनी स्वतःहून 'लाभ' सोडण्यासाठी सरकारतर्फे आवाहन केले जाणार आहे. सरकार स्थापन झाल्यापासून अर्ज बाद होणार असल्याची चर्चा सुरू आहे. परंतु, अद्याप थेट अर्ज बाद करण्याबाबत राज्याकडून जिल्हा प्रशासनाला सूचना देण्यात आलेल्या नाहीत. मात्र, स्वतःहून जर कोणी लाभ सोडण्यासाठी अर्ज करत असेल तर त्यांचा अर्ज वगळण्यासाठी प्रत्येक जिल्हाधिकारी यांच्या नावाने लॉगिन दिले जाणार असून, जिल्हापातळीवर नाव वगळण्याची सुविधा उपलब्ध केली जाणार आहे.

## मुंबई विमानतळावर मोठी कारवाई : सोन्यासह हिरे जप्त

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी तीन वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये २.४६५ किलो वजनाचे सोने आणि २४८.६५ कॅरेट वजनाचे हिरे जप्त केले.

जप्त केलेल्या वस्तूंची एकूण अंदाजे किंमत २.५४ कोटी रुपये असून या प्रकरणामध्ये तीन प्रवाशांना अटक करण्यात आली आहे. कस्टम अधिकाऱ्यांनी बँकॉकहून आलेल्या दोन प्रवाशांना रोखले आणि त्यांची तपासणी केली असता दोन्ही प्रवाशांच्या शरीरातून २४ कॅरेट सोन्याची एकूण २.४६५ किलो वजनाची माती सापडली. या सोन्याची किंमत १.८० कोटी रुपये असून दोन्ही व्यक्तींना ताब्यात घेण्यात आले आहे. दुसऱ्या कारवाईत कस्टम अधिकाऱ्यांनी मुंबईहून दुबईला निघालेल्या एका प्रवाशाची तपासणी केली. त्याच्या शरीरातून ५.२० लाख रुपयांचे 'कट आणि पॉलिश केलेले लॅबमध्ये उगवलेले २१.७० कॅरेट सैल हिरे' जप्त करण्यात आले.

## मनीएज घोटाळाप्रकरणी ४ भूखंड, ८ सदनिकांवर टाच

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** टोरेस घोटाळ्यापाठोपाठ वित्तीय गुंतवणूक सल्ला सेवा पुरवणाऱ्या मनीएज ग्रुप ऑफ कंपनीजकडूनही गुंतवणूकदारांची आर्थिक फसवणूक झाली असून या प्रकरणाच्या तपासाला आर्थिक गुन्हे शाखेने वेग दिला आहे. या फसवणूक प्रकरणातील ४ भूखंड आणि ८ सदनिकांवर गुन्हे शाखेने नुकतीच टाच आणली. हा कोट्यवधी रुपयांचा घोटाळा असल्याचा अंदाज आहे.

मनीएज ग्रुप ऑफ कंपनीज'अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या 'मनीएज इन्व्हेस्टमेंट', 'मनीएज फायनकॉर्प', 'मनीएज रिअल्टर्स', 'मनीएज कॅपिटल सर्व्हिसेस' या कंपन्यांकडून गुंतवणूकदारांना २४ टक्के दराने वार्षिक परतावा देण्याचे आमिष दाखवले होते. मात्र, कंपनीने गुंतवणूकदारांची आर्थिक फसवणूक केली आहे.

# चालू शैक्षणिक वर्षापासून सीबीएसई पॅटर्न

## ना.दादा भुसेंची माहिती- शिक्षण विभाग कामकाजाचा आढावा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते शालेय शिक्षण विभागाच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी पुणे दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी सीबीएसई पॅटर्नबाबत महत्वाची माहिती दिली. ते म्हणाले, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाकडे (सीबीएसई) पालकांचा सर्वाधिक ओढा आहे.म्हणूनच आता राज्यातील सरकारी आणि अनुदानित शाळांमध्ये सीबीएसई पॅटर्न शैक्षणिक वर्ष २०२५- २६ पासून राबविण्यात येणार आहे. इयत्ता पहिलीला शैक्षणिक वर्ष २०२५- २६ मध्ये 'सीबीएसई पॅटर्न' सुरू करण्यात येणार आहे. तर, शैक्षणिक वर्ष २०२६- २७ मध्ये दोन टप्प्यांत हा पॅटर्न राज्यात राबविला जाणार असल्याचं विधान मंत्री भुसे यांनी केले.

महाराष्ट्रात पुन्हा सत्तेत परतल्यानंतर महायुती सरकारचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी मीटिंगचा धडाका लावला आहे. तसेच काही दिवसांपूर्वीच त्यांनी मंत्रालयातील सर्व विभागाच्या पुढील १०० दिवसांच्या कामकाजाचा रोडमॅप मागितला आहे.त्यामध्ये शालेय शिक्षण विभागाच्या बैठकीतही त्यांनी शिक्षण विभागानं गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी पावले उचलावीत काही महत्वाचे निर्देश दिले होते. त्यानंतर राज्यातील सर्वच शाळांमध्ये सीबीएसई पॅटर्नचा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आता याबाबत आता शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी एक महत्त्वाची अपडेट दिली आहे.

भुसे म्हणाले,विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी पावले उचलली जात आहेत. त्यात राज्यातील शाळांमध्ये सीबीएसई पॅटर्न राबविण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे.

त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये इयत्ता पहिलीला 'सीबीएसई पॅटर्न'लागू होईल. तर शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये अन्य इयत्तांचा 'सीबीएसई'नुसार नवीन अभ्यासक्रम तयार करणे, त्यावर आधारित पाठ्यपुस्तके बालभारतीमार्फत छापणे अशी कार्यवाही होईल. दरम्यान, या वर्षभरात शिक्षकांना नवीन अभ्यासक्रमाची माहिती देऊन त्यांना प्रशिक्षण दिले जाईल."

यावेळी शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी शिक्षणविभागाच्या एका महत्त्वपूर्ण उपक्रमाविषयी माहिती दिली. ते म्हणाले,राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांचा विकास व्हावा, विद्यार्थ्यांना सुविधा मिळाव्यात, यासाठी शालेय शिक्षण मंत्र्यांपासून प्रत्येक शिक्षणाधिकारी एका शाळेची जबाबदारी स्वीकारणार आहे. यात, शाळेच्या छोट्या-मोठ्या अडचणी सोडविणे, शाळेच्या विकासास हातभार लावण्याची जबाबदारी घेतली जाईल. या धर्तीवर प्रत्येक तालुक्यातील एका शाळेवर माझ्यासह सर्व शिक्षणाधिकाऱ्यांना विशेष लक्ष द्यावं लागणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केलं आहे.

राज्यातील कमी पटसंख्येच्या शाळा बंद होणार नाहीत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील विद्यार्थी संख्या वाढविण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करायला हवेत. कमी पटसंख्येच्या शाळा बंद करण्याऐवजी तेथील विद्यार्थी संख्या वाढविण्यासाठी प्रयत्न केले जातील. परंतु, काही शाळांमध्ये पटसंख्या शून्य आहे, अशा ठिकाणी मात्र शाळांचा विचार करायला हवा, असंही मंत्री दादा भुसे यांनी सांगितले.




# आता सन २०२७-२८ ला होणार भारत तिसरी अर्थव्यवस्था




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भारतात मोठया प्रमाणात झालेल्या डिजिटलायझेशनमुळे प्रत्येक सेवेची आर्थिक नोंद होत आहे. प्रत्यक्ष नोंद होत असल्याने देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्न (जीडीपी) मध्ये देखील याची गणना केली जाईल. आपण प्रत्येकाला रोख व्यवहारापासून दूर नेत डिजिटलाईज झालो, तर सन २०२७ किंवा २०२८ ला भारत तिसरी आर्थिक महासत्ता होईल, असे प्रतिपादन अर्थतज्ज्ञ दीपक करंजीकर (मुंबई) यांनी केले. स्वानंद प्रतिष्ठानच्यावतीने स्वानंद व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते.

त्यातील पहिल्या सत्रात ते बोलत होते. यावेळी अर्थतज्ज्ञ सुनील सप्रे, सुनील भिडे, माजी नगरसेविका अश्विनी पोकळे, नीता दांगट पाटील, प्रतिष्ठानचे प्रकाश असलेकर आदी उपस्थित होते. केंद्रीय नागरी विमान वाहतूक व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी कार्यक्रमाला शुभेच्छा संदेश पाठविला आहे.

# राज्यातील शाळांची संख्या गेल्यावर्षीच्या तुलनेत घटली

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** प्राथमिक शिक्षण संचालनालयातर्फे आरटीईअंतर्गत प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येते. त्यात वंचित घटकांतील, आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना खासगी शाळांमध्ये २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश देण्यात येतो. त्यानुसार प्राथमिक शिक्षण संचालनालयाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या प्रवेशांसाठी १८ डिसेंबरला शाळा नोंदणीची प्रक्रिया सुरू करून ३१ डिसेंबरपर्यंतची मुदत दिली होती.

मात्र, शाळांची अपेक्षित नोंदणी न झाल्यामुळे ४ जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली. या मुदतीत राज्यभरातील ८ हजार ८६३ शाळांमध्ये १ लाख ९ हजार १३४ जागा उपलब्ध झाल्या आहेत. तर शैक्षणिक वर्ष २०२४-२५ राज्यातील ९ हजार २१७ खासगी शाळांमध्ये १ लाख ५ हजार २३८ रिक्त जागा उपलब्ध झाल्या होत्या. त्यामुळे गेल्यावर्षीच्या तुलनेत पुढील शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेत ३५४ शाळा कमी झाल्याचे, तर ३ हजार ८९६ जागा वाढल्या आहेत. प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांची ऑनलाइन अर्ज २७ जानेवारीपर्यंत भरता येणार आहे. अर्ज नोंदणी सुरू झाल्यापासून प्रक्रिया सुरू झाल्यापासून ३७ हजारांपेक्षा जास्त अर्ज दाखल झाले आहेत.

शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत (आरटीई) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. मात्र या प्रक्रियेत प्रवेशासाठी उपलब्ध जागा वाढल्या असल्या, तरी राज्यभरातील शाळांची संख्या गेल्यावर्षीच्या तुलनेत घटल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे शाळांची संख्या का कमी झाली याच्या कारणांचा शोध शिक्षण विभागाने सुरू केला आहे.

शाळांच्या कमी सहभागाबाबत आप पालक युनियनचे मुकुंद किर्दत म्हणाले, आरटीई संकेतस्थळावरील आकडेवारीवरून शाळा कमी का झाल्या हे स्पष्ट होत नाही. गेल्या काही वर्षांत संस्थांचा अल्पसंख्याक दर्जा घेण्याकडे कल वाढतो आहे. तसेच ग्रामीण भागातील शाळा बंद पडत आहेत का, असा प्रश्न आहे. मात्र, शाळा कमी होण्याची कारणे शिक्षण विभागाने जाहीर केली पाहिजेत.

दरम्यान, शाळा कमी होण्याची कारणे वेगवेगळी असू शकतात. स्थलांतर, आरटीई निकषांनुसार आधीच्या वर्षी प्रवेश न होणे अशा कारणांचा समावेश असू शकतो. मात्र, कोणत्या जिल्ह्यांत किती शाळा कमी झाल्या आहेत याची कारणांसह यादी शिक्षणाधिकाऱ्यांकडून मागवण्यात आली आहे. त्यातून नेमकी कारणे स्पष्ट होऊ शकतील, असे प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी स्पष्ट केले.



# आ.सुनील शिंदे यांच्या गाडीला बेस्ट बसची धडक

**मुंबई :** शिवसेना ठाकरे गटाचे आमदार सुनील शिंदे अपघातात थोडक्यात बचावले. शिंदे यांच्या गाडीला बेस्ट बसने जोराची धडक दिली. गाडीतून उतरून शिंदे महेश सावंत यांच्या कार्यालयाच्या दिशेला निघून गेले. इतक्यात बेस्ट बसने त्याच्या गाडीला धडक दिली. यात गाडीचे मोठे नुकसान झाले आहे. गाडीत ड्रायव्हर होता, मात्र तो सुखरूप असल्याची माहिती मिळत आहे.



# सात कोटी भाविकांनी केले 'संगम स्नान'

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**प्रयागराज :** उत्तर प्रदेशच्या प्रयागराज येथे दि. १३ जानेवारीपासून अध्यात्माचा भव्य महोत्सव 'महाकुंभ'ला सुरुवात झाली. देश विदेशातून मोठ्या संख्येने भाविक महाकुंभात आले असून त्रिवेणी संगमात स्नान करण्याता अनुभव घेत आहेत. महाकुंभच्या पहिल्या दिवशी साधारण एक कोटीहून अधिक भाविकांना स्नान केल्याची माहिती होती.

त्यानंतर मकर संक्रांतीच्या दिवशी नागा साधूंसह साधारण ३.५० कोटी भाविकांनी पहिले अमृत स्नान केले. मिळालेल्या माहितीनुसार, महाकुंभ सुरु झाल्यापासून दि. १६ जानेवारीपर्यंत अवघ्या सहा दिवसांत तब्बल सात कोटींहून अधिक लोकांनी संगम आणि इतर घाटांवर पवित्र स्नान केले आहे. तरी महाकुंभात ४५ कोटींहून अधिक लोक पवित्र स्नान करतील असा अंदाज आहे.

महाकुंभाच्या पहिल्या दिवशी पौष पौर्णिमानिमित्त १.७० कोटी लोकांनी स्नान केल्याची विक्रमी नोंद झाली होती. दुसऱ्या दिवशी, मकरसंक्रांती अमृतस्नानानिमित्त ३.५० कोटी लोकांनी अमृत स्नान केल्याची नोंद आहे.

अशाप्रकारे महाकुंभाच्या पहिल्या दोन दिवसांत ५.२० कोटींहून अधिक लोकांनी श्रद्धेने स्नान केले. याशिवाय १५ जानेवारीला महाकुंभाच्या तिसऱ्या दिवशी ४० लाख लोकांनी स्नान केले. गुरुवारीही ३० लाखांहून अधिक लोकांनी संगमात पवित्र स्नान केले. हा महाकुंभ संपूर्ण जगाला एकता, सौहार्द आणि मानवतेचा मोठा संदेश देत आहे.

# महाराष्ट्रातील सरकारी कर्मचारी सरसावले आठव्या वेतनसाठी!

**वेतनवाढ**

**केंद्र सरकारने सरकारी कर्मचाऱ्यांसाठी आठवा वेतन आयोग लागू केल्याने केंद्रीय कर्मचाऱ्यांचे पगार वाढणार आहे. त्यामुळे सरकारी कर्मचारी आनंदात आहे. त्यानंतर राज्य सरकारने देखील राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांसाठी ८ वा वेतन आयोग लागू करावा अशी आग्रही मागणी महाराष्ट्रातील सरकारी कर्मचाऱ्यांनी सरकारकडे केली आहे.**

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्याचा तिजोरीवर पडणार २० हजार कोटी रुपयांचा बोजा सुमारे सव्वा लाख राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी महाराष्ट्रातही हा वेतन आयोग लागू करावा अशी मागणी केली आहे. या निर्णयाला मंजुरी मिळाल्यास सरकारी तिजोरीवर वार्षिक २० हजार कोटी रुपयांचा बोजा पडणार आहे.

मागील महाराष्ट्र सरकारने २००९ आणि २०१९ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी अनुक्रमे सहावा आणि सातवा वेतन आयोग लागू केला होता. शिफारस केलेल्या मुदतीपेक्षा तीन वर्षे उशिरा हा वेतन आयोग लागू करण्यात आला होता. यावेळीही राज्य सरकार २०२९ च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीपर्यंत ही मागणी पुढे ढकलण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र वित्त विभागातील एका अधिकाऱ्याने वृत्तपत्राशी बोलताना सांगितले की, 'सहावा आणि सातवा वेतन आयोग २००९ आणि २०१९ मध्ये निवडणुकांच्या तोंडावर देण्यात आला होता.

शिवाय केंद्रीय आयोगाने अहवाल सादर केल्यानंतरच राज्य आयोगांची स्थापना करण्यात आली. यावेळी २०२६ च्या मध्यापर्यंत अहवाल सादर होईल, अशी अपेक्षा आहे. त्यानंतरच राज्य आयोगाची स्थापना होऊ शकते आणि तो २०२७ च्या सुरुवातीला हा आयोग त्यांचा वेतन आयोग लागू करण्याबाबतअहवाल सादर करण्याची शक्यता आहे.




### २० ते २५ टक्के पगारवाढ

● विशेष म्हणजे वेतन आयोगाच्या शिफारशींच्या आधारे सरकारी कर्मचाऱ्यांना दर दहा वर्षांनी वेतनवाढ मिळते. आधीच्या सुधारणेत २० ते २५ टक्के पगारवाढ करण्यात आली होती आणि आताही अशीच वाढ अपेक्षित आहे, असे या अधिकाऱ्याने सांगितले.

● २०२४-२५ मधील २.३ लाख कोटी रुपयांची नैसर्गिक वाढ वगळून वेतन बिलात वर्षाला किमान २०,००० कोटी रुपयांची वाढ होणार असल्याने वेतन आणि पेन्शनमध्येही अशीच वाढ अपेक्षित आहे. आम्ही २०१९ मध्ये सातव्या वेतन आयोगाचा अहवाल लागू केला तेव्हा २०१९-२० मध्ये वेतन आणि पेन्शनची वेतन बिले १.३६ लाख कोटी रुपयांवर गेली, जी त्याच्या आधीचया वर्षी १.६ लाख कोटी रुपये होती. या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीला विलंब झाला असला तरी आठवा वेतन आयोग १ जानेवारी २०२६ पासून लागू होणार असून राज्य सरकारला कर्मचाऱ्यांची थकबाकी भरावी लागणार आहे.



> मागील ६-७ वर्षांतील क्रिकेटचं वेळापत्रक पाहिलं तर, हे नक्की समजून येईल की आम्हाला घरी ४५ दिवसही थांबता येत नाहीए. इंडियन प्रीमिअर लीग संपल्यानंतर आम्हाला तो वेळ मिळतो, जेव्हा क्रिकेटमध्ये काहीच सुरू नसतं. आपल्या देशांतर्गत स्पर्धा ऑक्टोबरला सुरू होतात आणि मार्चच्या शेवटच्या आठवड्यात संपतात. या कालावधीत जो खेळाडू राष्ट्रीय संघाकडून तिन्ही फॉरमॅटमध्ये खेळत नसेल, त्याला देशांतर्गत क्रिकेट खेळणे शक्य असते.. २०१९ पासून मी सातत्याने कसोटी क्रिकेट खेळतोय. जेव्हा तुम्ही आंतरराष्ट्रीय क्रिकेट सातत्यपूर्व खेळता, तेव्हा तुम्हाला विश्रांतीसाठी, रिफ्रेश होण्यासाठी वेळ हवा असतो. याचा कुणीच विचार करत नाही. — रोहित शर्मा

# टीम इंडीयाची घोषणा!

## शमीची वापसी : उपकर्णधारपदी 'या' युवा खेळाडूची लागली वर्णी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ साठी बीसीसीआयने रोहित शर्माच्या नेतृत्त्वाखालील १५ सदस्यीय भारतीय संघ जाहीर केला आहे. हाच संघ इंग्लंडविरुद्धच्या वनडे मालिकेत खेळणार आहे. या संघाच्या उपकर्णधारपदी युवा खेळाडू शुबमन गिलची वर्णी लागली आहे. त्याचबरोबर इंग्लंडविरुद्धच्या वनडे मालिकेदरम्यान जसप्रीत बुमराह खेळणार नसल्याने त्याच्या जागी हर्षित राणा खेळणार आहे.

चॅम्पियन्स ट्रॉफी आणि इंग्लंडविरुद्धच्या वनडे मालिकेसाठी जाहीर करण्यात आलेल्या भारतीय संघात काही बदल करण्यात आले आहेत. ज्यामध्ये मोहम्मद शामी खूप दिवसांनी पुनरागमन झाले आहे. तो २०२४ च्या विश्वचषकानंतरपासून दुखापतीमुळे संघातून बाहेर होता. विशेष म्हणजे यशस्वी जैस्वाला पहिल्यादांच वनडे संघात स्था मिळालं आहे. यावेळी चॅम्पियन्स ट्रॉफी पाकिस्तान आणि दुबईमध्ये हायब्रीड मॉडेल अंतर्गत खेळवली जाणार आहे. या स्पर्धेतील पहिला सामना १९ फेब्रुवारीला यजमान पाकिस्तान आणि न्यूझीलंड यांच्यात कराची येथे होणार आहे. तर भारतीय संघ बांगलादेशाविरुद्ध २० फेब्रुवारी रोजी दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर पहिला सामना खेळणार आहे.

### चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चे स्वरुप :

- आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मध्ये ८ संघांमध्ये एकूण १५ सामने होणार आहेत. संघांची २ गटात विभागणी करण्यात आली आहे. भारत आणि पाकिस्तान एकाच गट-अ मध्ये आहेत. त्यांच्यासह उर्वरित दोन संघ न्यूझीलंड आणि बांगलादेश आहेत. तर दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, अफगाणिस्तान आणि इंग्लंड यांना ब गटात ठेवण्यात आले आहे. सर्व ८ संघ आपापल्या गटात ३-३ सामने खेळतील. यानंतर, प्रत्येक गटातील टॉप-२ संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरतील. पहिला उपांत्य सामना दुबईत, तर दुसरा लाहोरमध्ये होणार आहे. यानंतर अंतिम सामना खेळवला जाईल. अशा परिस्थितीत एखादा संघ अंतिम फेरीत पोहोचला तर तो स्पर्धेत एकूण ५ सामने खेळेल.

### भारताचे चॅम्पियन्स ट्रॉफीतील संपूर्ण वेळापत्रक :

- भारतीय संघ चॅम्पियन्स ट्रॉफीतील आपल्या मोहिमेची सुरुवात बांगलादेशविरुद्धच्या सामन्याने करणार आहे. उभय संघांमधील सामना २० फेब्रुवारी रोजी दुबईत होणार आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यात २३ फेब्रुवारीला सामना होणार आहे. टीम इंडिया २ मार्चला न्यूझीलंडशी भिडणार आहे. जर भारताने गट सामन्यांमध्ये अव्वल स्थान कायम राखले आणि पुढील फेरीत प्रवेश केला तर ४ मार्च रोजी उपांत्य फेरीचा सामना खेळेल. या स्पर्धेचा अंतिम सामना ९ मार्च रोजी होणार आहे.

### चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी भारताचा संघ

- रोहित शर्मा (कर्णधार), शुभमन गिल (उपकर्णधार), विराट कोहली, श्रेयस अय्यर, केएल राहुल, हार्दिक पंड्या, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह, मोहम्मद शामी, अर्शदीप सिंग, यशस्वी जैस्वाल, ऋषभ पंत आणि रवींद्र जडेजा.

## राजगड क्रिकेट क्लब व पुणे क्रिकेट क्लब यांच्यात अंतिम लढत





**पुणे :** युवा पर्व फाउंडेशन व पवार फाउंडेशन यांच्या वतीने आयोजित युथ करंडक १२ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत उपांत्य फेरीत राजगड क्रिकेट क्लब व पुणे क्रिकेट क्लब या संघांनी अनुक्रमे अगस्त्य क्रिकेट क्लब व डीपीइएस क्रिकेट क्लब या संघांचा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. राजगड स्पोर्टस अकादमी येथील क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत उपांत्य फेरीत पहिल्या सामन्यात आयुश कटके(२-१५ व १७) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर पुणे क्रिकेट क्लब संघाने डीपीइएस क्रिकेट क्लब संघाचा ६ गडी राखून पराभव करत अंतिम फेरीत धडक मारली.

दुसऱ्या उपांत्य फेरीच्या सामन्यात रूद्र पाबळे(४-२४ व ४५धावा) याने केलेल्या सुरेख खेळीच्या जोरावर राजगड क्रिकेट क्लब संघाने अगस्त्य क्रिकेट क्लब संघाचा ८ गडी राखून पराभव करत अंतिम फेरीत स्थान निश्चित केले.

## स्पोर्ट्स मॅनियाचा विजयी सिलसिला कायम





**पुणे :** स्पोर्ट्स मॅनियाने सांघिक कामगिरीत कमालीचे सातत्य राखत चुरशीच्या लढतीत एआरए एफसीवर २-१ अशी मात करत एआयएफएफ एलिट युथ लीगच्या एच गटामध्ये चौथा विजय नोंदवला.. अहमदाबाद (गुजरात) येथील अदानी शांतीग्राम फुटबॉल ग्राउंड, खोडियार येथे झालेल्या सामन्यात तासाभराचा खेळ झाल्यानंतर एका खेळाडूला रेड कार्ड दाखवण्यात आल्याने स्पोर्ट्स मॅनियाला उर्वरित वेळात १० खेळाडूंसह खेळावे लागले. तरीही एक गोल करत त्यांनी सर्वोत्तम विजयाची नोंद केली. पहिल्या हाफमध्ये गोलशून्य बरोबरीनंतर स्पोर्ट्स मॅनियाच्या वेदांत जैस्वालला ५१व्या मिनिटाला मैदान सोडावे लागले. राजीव कांबळेने ओव्हरहेड पास चुकवल्यानंतर प्रतिस्पर्ध्यांच्या आक्रमणकर्त्याला चुकीच्या पद्धतीने अडवल्याने रेफ्रींनी वेदांतला रेड कार्ड दाखवले. प्रतिस्पर्ध्यांचा एक खेळाडू कमी असल्याचा फायदा यजमान संघाने उठवला. तीन मिनिटांनंतर कितमचा तोईजमने (५४वे) एआरए एफसीला १-० असे आघाडीवर नेले. मात्र, यजमान संघाचा आघाडीचा आनंद अल्पकाळ टिकला. पृथ्वीराज पाटीलने ६०व्या मिनिटाला स्पोर्ट्स मॅनियाला १-१ अशी बरोबरी साधून दिली. पृथ्वीराजचा हा स्पर्धेतील तिसरा गोल होता. पृथ्वीराजने डिफेंडर क्लीयरन्स मिळवल्यानंतर गोल केला. ज्याने मिडफिल्डरला रिबाउंड करत पृथ्वीला क्लियरमध्ये सोडले आणि गोल करण्यासाठी पुढे गेला. बरोबरीने पाहुण्यांचा आत्मविश्वास उंचावला. त्यानंतर पुणे स्थित स्पोर्ट्स मॅनियाने शेवटच्या दहा मिनिटांत गोल करताना २-१ अशी विजयी आघाडी घेतली. शौनक धापटेचा (८०व्या) हा लेट गोल निर्णायक ठरला. या गोलसह स्पोर्ट्स मॅनियाने लीगच्या गटवार साखळी टप्प्यातील तिसऱ्या 'अवे' विजयावर शिक्कामोर्तब केले. शौनकने घेतलेल्या कॉर्नर-किकवर गोल झाला. त्याने पटकन बॉक्सच्या शीर्षस्थानी धाव घेत चेंडूवर ताबा मिळवला. त्यानंतर चेंडू अचूकपणे गोलजाळ्यात ढकलला.

## श्वसनाचा त्रास, दुखापतीला झुगारून जोकोविचची घोडदौड

**नवी दिल्ली :** सनाचा त्रास आणि दुखापतीला झुगारून सर्बियाच्या नोव्हाक जोकोविचने ऑस्ट्रेलियन खुल्या ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेतील आपली घोडदौड कायम राखली. त्याच वेळी पुरुषांमध्ये अॅलेक्झांडर झ्वेरेव आणि कार्लोस अल्कराझ, तर महिलांमध्ये गतविजेती अरिना सबालेन्का आणि कोको गॉफ या आघाडीच्या खेळाडूंनीही आपापले सामने जिंकताना चौथी फेरी गाठली.

आपले २५वे ग्रँडस्लॅम जेतेपद मिळवण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या जोकोविचने तिसऱ्या फेरीच्या लढतीत चेक प्रजासत्ताकच्या टोमास मॅकहाकला ६-१, ६-४, ६-४ असे सहज पराभूत केले. मात्र, यावेळी त्याला शरीरिकदृष्ट्या संघर्ष करावा लागला. त्याच्या पाठीवर मोठी पट्टी लावण्यात आली होती. तसेच त्याला श्वास घेण्यासाठी त्रास झाला. त्यामुळे दुसऱ्या सेटमधील तीन गेम झाल्यानंतर त्याने वैद्यकीय 'टाइम-आऊट' घेतला. त्याला डॉक्टरांकडून काही गोळ्या देण्यात आल्या.

## पाकिस्तानने घरच्या मैदानावर विंडीजसमोर टेकले गुडघे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** दक्षिण आफ्रिका दौऱ्यात कसोटी मालिकेत व्हाईटवॉश स्वीकारल्यानंतर पाकिस्तान मायदेशात वेस्ट इंडिजविरुद्ध सध्या कसोटी मालिका खेळत आहे. पण पहिल्याच सामन्याच्या पहिल्या डावात पाकिस्तानची अवस्था बिकट झाली आहे. सौद शकील आणि मोहम्मद रिझवान यांचा अपवाद वगळला, तर अन्य पाकिस्तानी फलंदाज पहिल्या डावात सपशेल अपयशी ठरले.

मुलतानला होत असलेल्या या सामन्यात पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. पण पाकिस्तानकडून कर्णधार शान मसूद आणि मुहम्मद हुरेरा हे सलामीला फलंदाजीसाठी उतरले.

पण संघाच्या १६ धावा झालेल्या असतानाच हुरेरा (६) बाद झाला. त्यापाठोपाठ मसूदही ११ धावा करून बाद झाला. बाबर आझम आणि कामरान घुलाम यांनीही स्वस्तात विकेट्स गमावल्या. यातील मसून वगळता तिघांना जेडन सील्सने बाद केले. त्यामुळे पाकिस्तानची अवस्था ४६ धावा ४ विकेट्स अशी झाली होती.

पण नंतर सौद शकील आणि मोहम्मद रिझवान यांनी डाव सावरला. या दोघांनी अर्धशतके करण्यासोबतच शतकी भागीदारी केली, त्यामुळे पाकिस्तानला १८० धावांचा टप्पा ओलांडता आला. परंतु संघाच्या १८७ धावा झालेल्या असताना शकिलला केविन सिन्क्लेअरने ८४ धावांवर बाद केले. त्यानंतर मात्र पाकिस्तानने झटपट विकेट्स गमावल्या.

शकील बाद झाल्यानंतर उर्वरित ५ विकेट्स ४३ धावांत गेल्या. म्हणजेच शेवटच्या ६ विकेट्स ४३ धावांमध्ये पाकिस्तानने गमावल्या. मात्र मध्ये ५ व्या विकेटसाठी शकील आणि रिझवान यांच्यात १४१ धावांची भागीदारी झाल्याने किमान पाकिस्तानला ६८.५ षटकात समाधानकारण २३० धावांपर्यंत पोहोचला आले.

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात राज्य क्रीडादिन उत्साहात साजरा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्य क्रीडा दिन हा फक्त एका दिवसापुरता मर्यादित न ठेवता त्याचे रुपांतर क्रीडा संस्कृतीत होणे गरजेचे आहे. यासाठी विभागातील विद्यार्थ्यांनी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन प्र-कुलगुरू प्रा. (डॉ.) पराग काळकर यांनी विद्यार्थ्यांना राज्य क्रीडा दिनानिमित्त संबोधित करताना केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात पै. खाशाबा जाधव यांचा जयंती दिन व दुसरा राज्य क्रीडा दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त प्र-कुलगुरू प्रा. (डॉ.) पराग काळकर, अधिसभा सदस्य श्री. गणपत नांगरे, क्रीडा व शारीरिक शिक्षण शास्त्र विभाग प्रमुख डॉ. विष्णु पेठकर व क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे प्रभारी क्रीडा संचालक डॉ. सुदाम शेळके यांनी विद्यापीठाच्या खाशाबा जाधव क्रीडा संकुलातील पै. खाशाबा जाधव यांच्या पुतळ्यास व प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

महाराष्ट्र शासनाने ऑलिंपिकवीर खाशाबा जाधव यांचा जन्मदिन दि. १५ जानेवारी हा राज्य क्रीडा दिन म्हणून जाहीर केला आहे. त्या निमित्ताने विद्यापीठात पै. खाशाबा जाधव यांचा जयंतीनिमित्त व राज्य क्रीडा दिनानिमित्त यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत डॉ. विष्णु पेठकर यांनी "CROSS X" या स्पर्धेची घोषणा केली व पुढील १५ दिवस विद्यापीठ आवारातील विद्यार्थ्यांना शारीरिक सुदृढता कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले.

विभागातील विद्यार्थी श्री. मोहित यांनी उपस्थितांना पै. खाशाबा जाधव यांच्या विषयीची माहिती सांगितली. तसेच यानिमित्त क्रीडा व शारीरिक शिक्षणशास्त्र विभागाने सकाळच्या सत्रात विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी फुटबॉल, क्रिकेट, व्हॉलीबॉल, रस्सीखेंच या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

## बुद्धिबळ स्पर्धेत एकूण २५५ खेळाडू सहभागी



**पुणे :** पुणे जिल्हा बुद्धिबळ सर्कल यांच्या आयोजित पीडीसीसी १३,१५,१९ वर्षाखालील मुले व मुली निवड चाचणी बुद्धिबळ स्पर्धेत एकूण ३५५ खेळाडूंनी आपला सहभाग नोंदवला आहे. हि स्पर्धा लोकशाहीर अण्णा भाऊ साठे हॉल, पुणे सातारा रोड व मिलेनियम नॅशनल स्कुल, कर्वेनगर येथे १८ व १९ जानेवारी २०२५ रोजी होणार आहे. स्पर्धा संचालक प्रकाश कुंटे यांनी सांगितले की, हि स्पर्धा महाराष्ट्र बुद्धिबळ संघटना(एमसीए) यांच्या मान्यतेखाली होत आहे. तसेच, हि स्पर्धा स्विस लीग पद्धतीने सात अथवा आठ फेऱ्यांमध्ये खेळविण्यात येणार आहे. स्पर्धेला ट्रुस्पेस यांचे मुख्य प्रायोजकत्व लाभले असून स्पोर्ट्स फर्स्ट व सर्फ एक्सेल मॅटिक यांचे सह प्रायोजकत्व लाभले आहे. १३ वर्षाखालील गटातील स्पर्धा मिलेनियम नॅशनल स्कुल, कर्वेनगर येथे होणार असून १५,१९ वर्षाखालील गटातील स्पर्धा लोकशाहीर अण्णा भाऊ साठे हॉल, पुणे सातारा रोड या ठिकाणी होणार आहे. स्पर्धेत ३५५ खेळाडूंनी आपला सहभाग नोंदवला आहे. हि स्पर्धा १३,१५,१९ वर्षाखालील अशा एकूण ३ गटात होणार आहे. यामध्ये कुशाग्र जैन (२०१२, १५ वर्षांखालील मुले), आर्यन राव (१८५५, १५ वर्षांखालील मुले), निहिरा कौल (१८४२, १५ वर्षांखालील मुली), प्रतिती खंडेलवाल (१५८४, १५ वर्षांखालील मुली), सुयोग वडके (१८०९, १९ वर्षाखालील मुले) , अलौकिक सिन्हा (१७३९, १९ वर्षांखालील मुले), मानसी टिळेकर (१६१५, १९ वर्षांखालील मुली), राजराजेश्वरी देशमुख (१५०४, १९ वर्षांखालील मुली), आदित्य जोशी (१८७७, १३ वर्षाखालील मुले), सिद्धांत साळुंके (१७४८, १३ वर्षाखालील मुले), मिहिका बोले (१५६२, १३ वर्षांखालील मुली), चतुर्थी परदेशी (१५०३, १३ वर्षांखालील मुली)यांचा समावेश आहे.

## ए अँड ए शार्क्स, सेनुमेरो हिबुटी चिताज, ओव्हनफ्रेश टस्कर्स, नॉक९९ पुणेरी बाप्पा संघांची आगेकूच

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पीवायसी हिंदू जिमखाना क्लबच्या वतीने अकराव्या पीवायसी- पुसाळकर प्रीमियर लीग क्रिकेट २०२५ स्पर्धेत साखळी फेरीत ए अँड ए शार्क्स, सेनुमेरो हिबुटी चिताज, ओव्हनफ्रेश टस्कर्स, नॉक९९ पुणेरी बाप्पा या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून आगेकूच केली.


पीवायसी मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत रौनक टिळक(नाबाद ५१) याने केलेल्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर कोतवाल युनिकॉर्न संघाने ट्रूस्पेस नाईट्स संघाचा ६ गडी राखून पराभव केला. दुसऱ्या लढतीत हर्षल गंद्रे नाबाद (७० धावा व १-९) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर ओव्हनफ्रेश टस्कर्स संघाने बदामीकर स्टार्स संघाचा ८ धावांनी पराभव केला.

काल रात्री उशिरा झालेल्या लढतीत मोनीश पिंपळखरे(१-१० व नाबाद ३९) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर सेनुमेरो हिबुटी चिताज संघाने कोतवाल युनिकॉर्न संघाचा ८ गडी राखून पराभव करून दुसऱ्या विजय मिळवला.

आशिष राठी(१-४ व नाबाद ३५) याने केलेल्या सुरेख खेळीच्या जोरावर ए अँड ए शार्क्स संघाने रांजेकर देवगावकर लायन्सवर ५ गडी राखून विजय मिळवला. आत्मन बागमार नाबाद ७० धावांसह आदित्य जाधव(३-६), आशिष देसाई(३-४) यांनी केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर नॉक९९ पुणेरी बाप्पा संघाने सुप्रीम बेल्फिन्स टायगर्स संघाचा ६७ धावांनी पराभव केला.

## रतिका चिंचवाडेला वेटलिफ्टींगमध्ये सुवर्ण पदक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** अस्मिता खेलो इंडिया महिला रँकिंग राष्ट्रीय वेटलिफ्टिंग स्पर्धा नुकतीच बेहरमपूर ओडिशा येथे आयोजित केली होती. या स्पर्धेत क्रिडा प्रबोधिनीची खेळाडू रतिका सुहास चिंचवाडे हिने राष्ट्रीय स्पर्धेमध्ये वेटलिफ्टींग मध्ये ६४ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले.

रतिका ने ७२ किलो स्नॅच,आणि ८६ किलो क्लिन आणि जर्क असे एकुण १५८ किलो वजन उचलून ६४ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले. क्रिडा प्रबोधिनीच्या मुख्य प्रशिक्षक उज्वला माने व वसीम सय्यद यांचे तिला मोलाचे मार्गदर्शन लाभले.या तिच्या यशामध्ये प्रशिक्षकांचे मोठे योगदान आहे. तसेच ही रतिकाची पहिलीच राष्ट्रीय स्पर्धा असून तिने पहिले राष्ट्रीय पदक जिंकले आहे. सर्वांनी तिचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## भारतीय महिला संघाचा शतकी गुणांचा चौकार!



**नवी दिल्ली :** इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियममध्ये सुरू असलेल्या खो-खो विश्वचषक २०२५ मध्ये भारतीय महिला संघांने शतकी गुणांचा चौकार मारत बांगलादेशाचा पाडाव केला. भारतीय महिलांचे आक्रमण इतके जोरदार होते की त्यापुढे बगलादेशाचा सहज पाडाव होणार हे लक्षात आल्याने प्रेक्षकांनी सुरवातीपासूनच ढोल ताशांचा नगारा वाजवणे सुरु होते. भारताची कर्णधार प्रियांका इंगळेने सरसेनापतीची भूमिका बजावत एक-एक खेळाडू बाद करताना जरासुद्धा दयामाया दाखवली नाही. तिला प्रमुख सरदाराच्या भूमिकेतील रेश्मा राठोडने आणि नसरीन शेखने मोलाची साथ दिल्याने बांगलादेशला माघारीची संधी सुद्धा न देता सरळ सरळ मोठा पराभव केला. भारतासाठी हा विजय खूप मोलाचा होता. यापुढे अजून दोन लढती असल्याने प्रतिस्पर्ध्यांच्या छातीत धडकी भरवण्यासाठी भारतीय छावणीत जोरदार तयारी केली होती आणि ती पूर्ण करण्यात सरसेनापती प्रियांका इंगळेने जरासुद्धा कसूर केली नाही. भारताने नाणेफेक जिंकून प्रथम आक्रमण स्वीकारले होते. कर्णधाराने घेतलेला निर्णय सार्थ ठरवताना भारताने ५० गुणांची कमी केली. तर संरक्षणात ६ ड्रीम रान मिळवत मध्यंतराला ५६-०८ अशी मोठी आघाडी घेतली होती. तर मध्यंतरानंतर तोच धडाका कायम राखत भारताने बांगलादेशचा १०९-१६ असा ९३ गुणांनी धुव्वा उडवला.

## गेम चेंजर्स, नॉक ९९ संघांची विजयी कामगिरी!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क





**पुणे :** पुणे क्रिकेट अ‍ॅकॅडमी आणि सागर कांबळे यांच्यावतीने कै. अभिषेक ठाकूर यांच्या स्मरणार्थ आयोजित 'अभिषेक ठाकूर करंडक' आंतरक्लब खुल्या गटाच्या ट्रेन्टी-२० क्रिकेट २०२४-२५ स्पर्धेत गेम चेंजर्स संघाने तिसरा तर, नॉक ९९ संघाने पहिला विजय मिळवून स्पर्धेत आगेकूच केली.

मुकुंदनगर येथील महाराष्ट्रीय मंडळाच्या क्रिकेट नेक्स्ट अ‍ॅकॅडमीच्या मैदानावर सुरू असलेल्या स्पर्धेत यशराज खाडे याने केलेल्या ९८ धावांच्या खेळीमुळे नॉक ९९ संघाने विजय क्रिकेट क्लबचा ७ धावांनी पराभव केला. पहिल्यांदा खेळताना नॉक ९९ संघाने १९९ धावांचे लक्ष्य उभे केले. यशराज खाडे याने ५५ चेंडूत ८ चौकार आणि ७ षटकारांसह ९८ धावांची खेळी केली. यांसह नील गांधी याने ४७ धावांची खेळी केली. या लक्ष्याचा पाठलाग करताना विजय क्रिकेट क्लबचा डाव १९२ धावांवर मर्यादित राहीला. अजिंक्य गायकवाड याने ७७ धावांची खेळी केली तर, सिद्धेश वरघंटे याने ३१ धावांचे योगदान दिले. परंतु संघाचा विजय ७ धावांनी दुर राहीला.

नौशाद शेख याने फटकावलेल्या ७० धावांच्या खेळीमुळे गेमचेंजर्सने व्ही-एड्ज संघाचा ६० धावांनी सहज पराभव करून तिसरा विजय नोंदविला. पहिल्यांदा फलंदाजी करताना गेमचेंजर्सने १८४ धावा धावफलकावर लावल्या. नौशाद शेख याने ३७ चेंडूत १० चौकार आणि २ षटकारांसह ६० धावांची खेळी केली. अभिनव तिवारी याने ४५ धावांचे योगदान दिले.

### पाचव्या दोशी इंजिनिअर्स करंडक आंतरक्लब वरिष्ठ क्रिकेट स्पर्धेत

## स्टार्स क्रिकेट, अँबिशियस, कॅडन्स संघांची आगेकूच

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क







**पुणे :** पाथ-वे फाउंडेशन यांच्या वतीने आयोजित व एमसीए यांच्या मान्यतेखाली होत असलेल्या पाचव्या दोशी इंजिनिअर्स करंडक आंतरक्लब वरिष्ठ निमंत्रित क्रिकेट स्पर्धेत गट साखळी फेरीत स्टार्स क्रिकेट क्लब, अँबिशियस क्रिकेट क्लब, कॅडन्स या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून आगेकूच केली.

शिंदे हायस्कूल येथील क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत क गटात मालोजी निगडे(५१धावा व २-५७) याने केलेल्या सुरेख खेळीच्या जोरावर स्टार्स क्रिकेट क्लब संघाने पारसी जिमखाना संघावर १ गडी राखून विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना पारसी जिमखाना संघाने ३६ षटकात ७ बाद २९५ धावाचे आव्हान उभे केले. यात निनाद चौगुलेने ६९ चेंडूत १३ चौकार व 3षटकाराच्या मदतीने ९२ धावा केल्या. निनादने कृशिल लोंढे(३० धावा)च्या साथीत पहिल्या विकेटसाठी ६३ चेंडूत ७३ धावांची भागीदारी केली. त्यानंतर सिद्धार्थ कर्पेने ५९ चेंडूत १० चौकार व 3 षटकारासह ८९ धावा करून निनादला साथ दिली. २९५ धावाचे आव्हान स्टार्स क्रिकेट क्लब संघाने ३५.४ षटकात ९ बाद २९९ धावा करून पूर्ण केले. यात सौरभ दरेकरने ५८ चेंडूत ९ चौकार व २ षटकाराच्या मदतीने ७३ धावा, मालोजी निगडेने ५२ चेंडूत ७ चौकार व 1 षटकारासह ५१ धावा केल्या. या जोडीने चौथ्या विकेटसाठी ५९ चेंडूत ७६ धावांची भागीदारी केली. त्यानंतर निशांत नगरकर ५५, नागेश रेगे ४०, सारिश देसाई नाबाद १४ यांनी धावा काढून संघाचा विजय सुकर केला.

वीरांगना क्रिकेट मैदानावरील लढतीत ब गटात अथर्व धर्माधिकारी(१०८धावा) याने केलेल्या धडाकेबाज शतकी खेळीसह निलय सिंगवी(४-३९), आर्या जाधव(४-९) यांनी केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर कॅडन्स संघाने मेट्रो क्रिकेट क्लबचा १६९ धावांनी धुव्वा उडवत धडाकेबाज सुरुवात केली.